Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक १५४ * * नागपूर *
गुरुवार, दिनांक १२ सप्टेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## अभिनेत्री मलायकाच्या वडिलांची आत्महत्या

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १०:**
अभिनेत्री मलायका अरोराच्या वडिलांचे बुधवारी निधन झाले. सकाळी 9 वाजता अनिल अरोरा (६२) यांनी सहाव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याचे सांगण्यात येत आहे.
पोलीस आणि फॉरेन्सिक टीम प्रत्येक अँगल लक्षात घेऊन तपास करत आहेत. मात्र अद्याप कोणतीही सुसाइड नोट सापडलेली नाही. मलायकाच्या जवळच्या सूत्रांनी पीटीआयला सांगितले की, अनिल अरोरा यांनी आत्महत्या केलेली नाही, हा अपघात आहे, याचा खुलासा पोलिसांच्या पंचनामा करण्यात येईल. दुसरीकडे, त्यांना कोणताही आजार नाही, असे त्यांच्या पत्नीने सांगितले.

### अग्रलेख खरीखरी...

## काँग्रेस व आप, कोण बाप?

अखेर हरियाणात काँग्रेस आणि आप यांचे जमले नाही. जमले नाही म्हणण्यापेक्षा यापुढे जमणार नाही, असाच एकूण रागरंग आहे. आतापर्यंत गेल्या दहा वर्षात काँग्रेस ज्या ज्या राज्यात सत्तेवर होती. त्या त्या राज्यात आम आदमी पक्षाने आपले बस्तान बसवले. पहिला प्रदेश म्हणजे दिल्ली, अण्णा हजारे यांच्या आंदोलनानंतर राजकीय पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेणारे अरविंद केजरीवाल होते. त्याला अण्णा हजारे यांचा घोर विरोध होता. पण त्या काळात अनेक बडे बडे नेते सोबत घेऊन केजरीवाल यांनी आम आदमी पक्षाची स्थापना केली. तेव्हा त्यांच्याबरोबर प्रशांत भूषण, योगेंद्र यादव, कवी कुमार विश्वास आणि इतर अनेक बडे बडे नेते होते. प्रशांत भूषण यांनी तर कोट्यवधी रुपयांची देणगी दिली होती. अशा या आम आदमी पक्षाला तत्कालीन काँग्रेस शासित राज्यात आपले बस्तान बसू शकते, हे समजून चुकले होते. काँग्रेसची यथेच्छ बदनामी करून त्याचा लाभ आपल्याला मिळू शकतो. असे अरविंद केजरीवाल यांना वाटले नसते तरच नवल. केजरीवाल यांच्या मनमोहक घोषणांनी सर्वात आधी दिल्लीकरांना आकर्षित केले. पहिल्यांदा त्यांना दिल्लीत ब?यापैकी जागा मिळाल्या तरी पूर्ण बहुमत मिळाले नव्हते. तेव्हा भाजपला विरोध हा समान धागा पकडून आप आणि काँग्रेसने संयुक्त सरकार बनवले. पण ते फार काळ टिकले नाही. त्यानंतर पुन्हा निवडणूक झाली आणि त्यात आम आदमी पक्षाने जवळजवळ 90 टक्के जागा जिंकून दिल्ली काबीज केली. भारतीय जनता पक्षाला एक आकडी यश मिळाले आणि काँग्रेस तर कुठल्या कुठे गडप झाली हे कळलेच नाही. त्यानंतर चांगल्या गुणवत्तापूर्ण शाळा, मोफत वीज, विनामूल्य पाणी आणि गरिबांना मोफत आणि इतरांना परवडेल अशा वैद्यकीय सेवा दिल्यामुळे आम आदमी पक्ष पुन्हा मोठ्या बहुमताने सत्तेवर आला. या काळात काँग्रेसला ना नेता होता ना नेतृत्व, यामुळे केजरीवाल यांनी गुजरातवर आपले लक्ष केंद्रित केले. तिथेही काँग्रेसला चांगलाच फटका बसला. दरम्यान ज्या गोव्यात काँग्रेसचे बऱ्यापैकी बस्तान बसलेले होते.

(▸▸ पान ८ वर)

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## वीजेचा शॉक लागून ४ शेतकऱ्यांचा मृत्यू

**■ महासागर प्रतिनिधी ब्रम्हपूरी, दि. १०:**
तालुक्यातील १५ किमी अंतरावर असलेल्या गणेशपूर (मेंडकी) येथील एकाच गावातील चौघांचा विद्युत तारांच्या स्पर्शाने मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना आज सकाळी १०:३० वाजता समोर आली. या घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.



एकाच गावातील चौघांचा समावेश ■ जिल्ह्यात सर्वत्र हळहळ

सकाळच्या सुमारास गणेशपूर (मेंडकी) येथील ७ शेतकरी शेतातील विहिरीतील मोटार पंपावरील केबल (वायर) टाकताना असताना अचानक तुटलेल्या केबलचा संपर्क पाण्याच्या प्रवाहाशी झाल्याने सातही शेतकऱ्यांना वीजेचा जोरदार धक्का बसला. या घटनेत पुंडलिक मानकर, प्रकाश राऊत, नानाजी राऊत, युवराज डोंगरे चौघांचा जागीच मृत्यू झाला. तीन शेतकरी गंभीर जखमी झाले. त्यांनी घटनेची माहिती गावात देताच गावातील नागरिकांनी शेतशिवारकडे धाव घेतली.

गंभीर जखमींवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहे. सदर घटनेची माहिती पोलीस स्टेशन ब्रह्मपुरी यांना देण्यात आली. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय ब्रम्हपुरी येथे पाठवण्यात आले.


घटनेची माहिती मिळताच विद्युत विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.या घटनेने गणेशपूर गावात सदर घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे.

दरम्यान, चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार तथा राज्याचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी या घटनेवर शोक व्यक्त केला आहे. तसेच या घटनेची सखोल चौकशी करण्याचेही निर्देश दिलेत.

> गणेशपूर येथील सात शेतकरी शेतात मोटार पंपावरील विद्युत केबल (वायर) टाकताना त्यांना वीजेचा धक्का बसला. विभागाच्या लाईन केबलचा कुठलाच संपर्क आलेला नाही. मी घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता त्यांनी कशासाठी तार टाकले ते समजले नाही.
> **दिनेश हनवते, अभियंता (गांगलवाडी सर्कल)**

## तर हे सर्व तुरुंगात असते... खरगे

**■ वृत्तसंस्था, अनंतनाग, दि. ११:**



काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी बुधवारी अनंतनागमध्ये सभा घेतली. ते म्हणाले, आज जम्मू-काश्मीरमध्ये सर्वत्र हल्ले होत आहेत, तरीही मोदीजी खोटे बोलायला मागे हटत नाहीत. कारण ते 'खोटारड्यांचे सरदार' आहेत. लोकसभा निवडणुकीचा संदर्भ देत ते म्हणाले- '400 पार वाले कुठे गेले? ते (भाजप) 240 जागांवरच अडकले. आम्हाला (विरोधकांना) आणखी 20 जागा मिळाल्या असत्या तर हे सर्व लोक तुरुंगात असते. हे लोक तुरुंगात जाण्यास पात्र आहेत.
भाजप भाषणे खूप करते, पण कृती आणि शब्दात खूप फरक आहे. भाजपने कितीही प्रयत्न केले तरी काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सची युती कमकुवत होणार नाही. संसदेत आम्ही आमची ताकद दाखवून दिली आहे. त्याच ताकदीने आम्ही पुढे जाऊ, असेही खरगे यावेळी म्हणाले.

## उधमपूरमध्ये २ अतिरेक्यांचा खात्मा

**■ वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ११:**
जम्मू-काश्मीरमधील उधमपूरमध्ये सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत २ दहशतवादी ठार झाले आहेत. लष्कराने सांगितले की, लष्कराच्या फर्स्ट पॅरा सैनिकांना बुधवारी सकाळी उधमपूरच्या खांद्रा टॉपच्या जंगलात २-३ दहशतवादी लपल्याची माहिती मिळाली होती.
यानंतर पोलिसांच्या सहकार्याने शोधमोहीम राबविण्यात आली. दुपारी १२.५० वाजता दहशतवाद्यांनी जवानांवर गोळीबार केला. प्रत्युत्तरात जवानांनीही गोळीबार केला. सुमारे चार तास चाललेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी तिन्ही दहशतवाद्यांचा खात्मा केला.
१० सप्टेंबरच्या मध्यरात्री २.३५ वाजता, पाकिस्तानी सैनिकांनी जम्मू-काश्मीरच्या अखनूरमध्ये सीमेवर शस्त्रसंधीचे उल्लंघन केले. प्रत्युत्तरात बीएसएफच्या जवानांनीही गोळीबार केला. या गोळीबारात बीएसएफचा एक जवान जखमी झाला आहे.
बीएसएफच्या प्रवक्त्याने सांगितले की, प्रत्युत्तरादाखल केलेल्या कारवाईत पाकिस्तानचे किती नुकसान झाले हे अद्याप समजलेले नाही. या घटनेनंतर बीएसएफचे जवान सीमेवर चोख बंदोबस्त ठेवत आहेत.


## जीवन प्राधिकरण कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११:**
जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना १ एप्रिल २०१७ ऐवजी १ जानेवारी २०१६ पासून सातवा वेतन आयोग १४ महिन्यांच्या थकबाकीसह लागू करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय मजदूर संघासोबतच्या बैठकीत वित्त विभागाच्या सचिवांना दिले.
मजीप्रा आपल्या स्तरावर थकबाकीसह एक जानेवारीपासून सातवा वेतन आयोग लागू करण्यास तयार आहे. परंतु वित्त विभागाने मंजुरी न दिल्यामुळे सदर प्रकरण प्रलंबित होते. उपमुख्यमंत्र्यांच्या निदेर्शांमुळे प्रश्न निकाली निघणार असल्याची माहिती भामसंचे प्रदेश महामंत्री गजानन गटलेवार यांनी दिली आहे.
भारतीय मजदूर संघ विदर्भ प्रदेश व महाराष्ट्र प्रदेश यांची संयुक्त बैठक राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत सह्याद्री अतिथी गृह, मुंबई येथे नुकतीच संपन्न झाली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे लवकरच सहाशे जागांवर कायमस्वरूपी भरती करण्यात येत असून शासनाच्या वतीने परीक्षा घेण्यात आली आहे. व त्याचा निकाल व नियुक्त्या प्रशासनाच्या वतीने लवकरच करण्यात येणार आहे. त्यामुळे सहाशे कंत्राटी कामगारांच्या नोकऱ्या जाणार आहे. भामसंघाच्यावतीने प्रश्न उपस्थित करून या कर्मचाऱ्यांना नोकरीत सुरक्षा देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली असता फडणीस यांनी या कर्मचाऱ्यांना नोकरीत सुरक्षा प्रदान करण्यात येवून मेडिकल मेयो तसेच सुपर स्पेशालिटी येथील रिक्त असलेल्या जागांवर कंत्राटी कामगार म्हणून सामावून घ्यावे, कोणालाही बेरोजगार करू नये असे निर्देश वैद्यकीय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना दिले.
नागपूर, वर्धा व चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्यातील सुरक्षारक्षकांच्या रिक्त पदांची भरती तसेच सुरक्षा रक्षक मंडळाच्या कर्मचाऱ्यांचा गणवेश बदलणे या दोन्ही विषयावर त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. तसेच राज्याच्या वन खात्या अंतर्गत कृती दल म्हणून कार्य करणाऱ्या कर्मचा?यांना फक्त १ ८०० रुपये मानधन मिळत आहे. ते कमीत कमी पाच हजार रुपये तरी देण्यात यावे तसेच व फॉरेस्ट गाईड म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मानधन देण्यात यावे या मागणीवर वनमंत्र्यासोबत चर्चा करून निर्णय घेऊ असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.






# आश्रमशाळांमध्ये परिचारिकांची पदे भरणार आदिवासी विकास विभागाचा निर्णय



राज्यातील शासकीय आश्रमशाळांमध्ये प्रवेशित अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत प्रशासन सजग आहे. आश्रमशाळेतच विद्यार्थ्यांना प्रथमोपचारासह इतर वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी परिचारिकांची नियुक्ती केली जाणार आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य संभाळण्याची जबाबदारी संबंधित परिचारिकेवर राहणार आहे.

**नयना गुंडे**
**(आयुक्त, आदिवासी विकास विभाग)**

**नाशिक, दि. ११ : प्रतिनिधी**

आदिवासी विकास विभागाने शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या देखरेखीसाठी बाहस्त्रोताव्दारे परिचारिकांची पदे भरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांवर आश्रमशाळेतच प्रथमोपचार होणार असून त्यांच्या आरोग्याची निगा राखली जाणार आहे.

आदिवासी विकास विभागाच्या राज्यात ४९९ आश्रमशाळा असून, त्यामध्ये सुमारे दोन लाख विद्यार्थी धडे गिरवतात. हे सर्व विद्यार्थी निवासी असल्याने त्यांचे आरोग्य सांभाळण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक, अधीक्षकांवर असते. दरवर्षी आश्रमशाळांना प्रथमोपचार पेटीसह औषध पुरवठा केला जातो. मात्र, वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तीची नियुक्ती नसल्याने प्रथमोपचार करताना अडचणी येतात. आता परिचारिकांची नियुक्ती होणार असल्याने विद्यार्थ्यांना योग्य प्रथमोपचार मिळणार आहे.

परिचारिका बाह्यस्त्रोताव्दारे भरण्यासाठी संस्थेची निवड करण्याकरिता आदिवासी आयुक्तालय स्तरावरून निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. पात्र व इच्छुक संस्थांना २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी पाचपर्यंत निविदा सादर करता येणार आहेत. दरम्यान, आदिवासी आयुक्तालय तसेच चारही अपर आयुक्त कार्यालयातील विविध पदांवर बाहस्त्रोताव्दारे नियुक्ती दिली जाणार आहे. त्यात वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

# ठेकेदाराकडून लाच स्वीकारणारा कल्याण-डोंबिवली पालिकेचा कनिष्ठ अभियंता निलंबित

**कल्याण, दि. ११ : प्रतिनिधी**

एका ठेकेदाराकडून कामाच्या बदल्यात लाच स्वीकारणारा कल्याण डोंबिवली पालिकेच्या दक्षता आणि गुणनियंत्रण विभागाचा कनिष्ठ अभियता तथा प्रयोगशाळा साहाय्यक संजय सोमवंशी यांना आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी सोमवारी तडकाफडकी निलंबित केले.



पालिका प्रशासनात काम करताना कोणत्याही कर्मचाऱ्याची गैरवर्तवणूक आणि गैरकाम खपवून घेतले जाणार नाही. गैरकाम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई केली जाईल.

**डॉ. इंदुराणी जाखड**
**आयुक्त.**

अभियंता सोमवंशी यांना निवृत्तीला चार महिने शिल्लक असताना, ते लाचखोरीच्या सापळ्यात अडकले. सोमवंशी यांच्या लाचखोरीमुळे कल्याण डोंबिवली पालिकेतील मागील २५ वर्षातील एकूण लाचखोर कर्मचाऱ्यांची संख्या आता ४४ झाली आहे. राज्यातील २७ महापालिकांमध्ये सर्वाधिक टक्केवारी आणि लाचखोरीचे प्रकार कल्याण डोंबिवली पालिकेत चालतात, याविषयी शासनाकडे गोपनीय विभागाचे अहवाल आहेत. त्यामुळे कल्याण डोंबिवली पालिकेत वर्णी लागण्यासाठी शासकीय सेवेतील अधिकारी राजकीय दबाव आणि मुख्याधिकाऱ्यांच्या मंत्रालयात वजन असलेल्या एका गटसमुहाच्या माध्यमातून प्रयत्नशील असल्याचे सांगण्यात येते.

**सोमवंशी सापळ्यात**

एका ठेकेदाराकडून कामाच्या बदल्यात पालिका मुख्यालयातील आपल्या दालनात कनिष्ठ अभियंता संजय सोमवंशी पैशाची लाच स्वीकारत आहेत, अशी दृश्यध्वनी चित्रफित सोमवारी दुपारी समाज माध्यमांवर प्रसारीत झाली. या दृश्यध्वनी चित्रफितीमध्ये अभियंता सोमवंशी हे लाच देणाऱ्या ठेकेदाराला, तो घ्यायला येतो एक आणि देतो एक. नमस्कार करतो आणि निघून जातो, असे बोलत असल्याचे दिसते. गटार आणि काँक्रिट रस्त्याच्या गुणवत्ता तपासणीच्या कामासाठी सोमवंशी यांनी ही लाच ठेकेदाराकडून स्वीकारली असल्याचे ठेकेदारांकडून सांगण्यात येते. तर, ध्वजनिधी संकलनासाठी ही रक्कम स्वीकारली असल्याचा बचावात्मक पवित्रा सोमवंशी यांनी घेतला असल्याचे प्रशासनातील चर्चेतून समजते. सोमवंशी यांना संपर्क साधला, तो होऊ शकला नाही.

**तात्काळ निलंबित**

पालिका मुख्यालयातील दक्षता व गुणनियंत्रण विभागाचा अभियंता लाच घेतानाची दृश्यध्वनी चित्रफित प्रसारित झाल्याची माहिती आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांना समजली. त्यांनी या विषयीची माहिती घेऊन तात्काळ कनिष्ठ अभियंता संजय सोमवंशी यांना पालिका सेवेतून निलंबित केले. त्यांची विभागीय चौकशी लावण्याचे आदेश आयुक्तांनी तात्काळ दिले. या तडकाफडकी आणि आक्रमक कारवाईमुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांना धडकी भरली आहे. दोन महिन्यापूर्वी खंडणीचा गुन्हा दाखल होताच पालिका सेवेतील वाहन चालक कामगार विनोद लकेश्री यांना आयुक्तांनी तात्काळ निलंबित केले होते. पालिका हद्दीतील रस्ते, गटार आणि इतर विकास कामे दर्जेदार होतात की नाही हे पाहणे पालिकेच्या दक्षता गुणनियंत्रण विभागाचे काम आहे. या विभागातील अभियंते मागील २५ वर्ष ठेकेदाराकडून चिरीमिरी घेऊन निकृष्ट कामांची पाठराखण करण्यात समाधान मानत आहेत. त्यामुळे पालिका हद्दीतील रस्ते कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याच्या तक्रारी आहेत.

# कोंडीनंतर अधिकाऱ्यांना जाग, उड्डाणपुलांलगत तात्पुरती दुरूस्ती, रस्त्यांच्या पहाणीला सुरूवात

**ठाणे, दि. ११ : प्रतिनिधी**

गेल्याकाही दिवसांपासून ठाण्यातील घोडबंदर भागात सुरू असलेल्या वाहतुक कोंडीमुळे हैराण झालेल्या ठाणेकरांनी प्रशासनाला धारेवर धरण्यास सुरूवात केल्यानंतर अखेर प्रशासनाला जाग आली आहे. सोमवारी ठाणे महापालिका आणि पोलीस प्रशासनाने कोलशेत- ढोकाळी भागातील रस्त्यांची पाहाणी केली. तर दुसरीकडे अपघाताचे केंद्र ठरलेल्या पातलीपाडा येथील उड्डाणपुलालगत सार्वजनिक बांधकाम विभागाने अडथळे बसवून तात्पुरती उपाययोजना करण्यास सुरूवात झाली आहे. लवकरच येथील उड्डाणपुलाच्या चढणी जवळील भागात कायमस्वरूपी उपाययोजना केल्या जाणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने सांगितले. परंतु या उपाययोजना कायमस्वरूपी अमलात आणाव्यात असे नागरिकांचे म्हणणे आहे.

ठाणे शहरातील कोंडीचे केंद्र ठरलेल्या घोडबंदर मार्गावर मागील काही दिवसांपासून मोठ्याप्रमाणात वाहतुक कोंडी होऊ लागली आहे. या कोंडीमध्ये शाळेच्या बसगाड्या, नोकरदारांची वाहने अडकत आहेत. मागील आठवड्यात सलग दोन दिवस वेगवेगळ्या कारणांमुळे झालेल्या अपघाताने अनेक शाळांनी दुपारच्या सत्रामध्ये सुट्टी जाहीर केली. तर, सकाळच्या सत्रातील शाळा सुटल्यानंतर दुपारी घरी परतणारे विद्यार्थी अडीच ते तीन तास कोंडीत अडकून होते. नोकरदारांनाही वेळेत कामाच्या ठिकाणी पोहचता आले नाही.



त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले होते.

या कोंडीनंतर समाजमाध्यमांवर तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या होत्या. टीकेचे धनी ठरलेल्या ठाणे महापालिका, पोलीस यंत्रणा, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी तात्काळ उपाययोजना करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, आता तात्पुरत्या स्वरूपातील उपाययोजना करण्यास सुरूवात झाली आहे. सोमवारी उपायुक्त पंकज शिरसाट, ठाणे महापालिकेचे अधिकारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मंजुषा भोंगळे आणि माजी नगरसेवक संजय भोईर यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी कोलशेत – ढोकाळी मार्गाची पाहाणी केली.

या मार्गावर मागील काही वर्षांत वाहतुकीचा भार वाढला आहे. कोलशेत येथे तयार करण्यात आलेले महापालिकेचे सेंट्रल पार्क यामुळे कोंडीत भर पडत आहे. त्यामुळे कोंडी टाळण्यासाठी काही ठिकाणी दुभाजक, गतीरोधक आहेत. त्यांचे स्थान बदलण्याबाबत चर्चा झाली आहे. तसेच येथील वाहतुकीचे आणखी काही दिवस सर्व्हेक्षण केले जाणार आहे. तसेच पातलीपाडा येथील उड्डाणपुलाजवळ सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्पुरत्या स्वरूपात अडथळे बसविले आहेत. उड्डाणपुलाच्या चढणीजवळ काही दुरूस्ती करून लवकरच कायमस्वरूपी उपाययोजना केल्या जाणार आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्यांच्या हद्दीतील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यास सुरूवात केली. तसेच कॅडबरी उड्डाणपुलाजवळही अपघात रोखण्यासठी नव्याने अडथळे बसविण्यात आले आहेत. उपाययोजना करण्यास सुरूवात झाली असली तरी त्या कायमस्वरूपी अमलात आणल्या जाव्यात अशी मागणी नागरिक करत आहेत.

# घोड्याच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी; मालकावर गुन्हा दाखल

**भिवंडी, दि. ११ : प्रतिनिधी**

दुचाकीस्वार शहरातील इदगाह परिसरातील पाण्याच्या टाकी जवळून जात असताना त्याच्या समोरून वेगाने धावत आलेल्या घोड्याने दुचाकीस्वारास जोरदार धडक दिली असता झालेल्या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.याप्रकरणी भोईवाडा पोलिस ठाण्यात घोडा मालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सगीर जहूर अहमद मन्सुरी (३५) असे अपघातात जखमी झालेल्या भीम कामगाराचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,जहुर इदगाह रोड परिसरातील धोबी घाट येथील इस्काय अपार्टमेन्ट मध्ये पहिल्या माळ्यावर राहत असून तो सोमवारी ९ सप्टेंबर रोजी रात्री सव्वा आठ वाजेच्या सुमारास त्याच्या होंडा कंपनीच्या पॅशन प्रो दुचाकीवरून त्याच परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ जात असताना त्याच्या समोरून भरधाव वेगात आलेल्या काळ्या रंगाच्या घोड्याने त्यास जोरात धडक दिली.त्यात जहुरच्या खांद्याला,डोक्यास,उजव्या पायाच्या नडगीस गंभीर जखम झाली आहे.तर याप्रकरणी जहुरच्या फिर्यादीवरून घोडा मालक हस्सान ईकबाल शेख याच्या विरोधात भोईवाडा पोलिस ठाण्यात भान्यासं २०२३ चे कलम २९१,१२५(अ),१२५(ख) न्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोउनि ए.सी.राठोड करीत आहेत.

# भिवंडीत गणेशोत्सवानिमित्त कडेकोट बंदोबस्त, 680 पोलिस तैनात ; गर्दीच्या ठिकाणी साध्या गणवेशातही पोलीस सज्ज

**भिवंडी, दि. ११: प्रतिनिधी**

भिवंडीत गणेशोत्सवासंदर्भात पोलिसांनी विशेष बंदोबस्त ठेवला आहे. शहरात ८० पोलिस अधिकाऱ्यांसह ६०० पोलिस तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय सर्व प्रमुख चौक आणि बाजारपेठांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे संशयास्पद व्यक्तींवर नजर ठेवण्यात येत आहे. शहरातील सार्वजनिक व गर्दीच्या ठिकाणी साध्या गणवेशातील पुरुष व महिला पोलिसही तैनात करण्यात आले आहेत.भिवंडीचे पोलीस उपायुक्त श्रीकांत परोपकरी यांनी अतिसंवेदनशील शहरात गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी विशेष मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. उत्सवा दरम्यान कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर कृत्य करताना आढळल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल,असे त्यामध्ये नमुद केले आहे.शहरात १५ हजार ८२६ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.यामध्ये १५९ सार्वजनिक गणपती मूर्ती आणि १५ हजार ६६७ घरगुती विघ्नहर्ता मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.त्यांच्या विसर्जनासाठी महापालिकेने व्यवस्था केली आहे.रविवारी रात्री उशिरापर्यंत दीड दिवसांच्या गणपतींचे विसर्जन करण्यात आले.तर पाच दिवस गौरी गणपती आणि अनंत चतुर्दशीच्या गणपतींचे विसर्जन नदीनाका, वरळदेवी तलाव, भादवड, कशेळी, काल्हेरसह ३२ ठिकाणी केले जाणार आहे.कोणतेही समाजकंटक कृत्य झाल्यास तत्काळ पोलिसांना कळवावे, असे आवाहन पोलिस उपायुक्तांनी केले आहे.

# पुण्यात गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणाचाच 'आव्वाज'!

**पुणे, दि. ११ : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पहिल्या दोन दिवसांत शहरात सर्वच ठिकाणी आवाजाच्या पातळीने ध्वनिप्रदूषणाची कमाल मर्यादा ओलांडल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मोजण्यात आलेल्या ध्वनिपातळीतून हे स्पष्ट झाले आहे. यंदाच्या गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश राष्ट्रीय हरित लवादाने दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून शहरातील २०० गणेश मंडळांच्या ठिकाणी ध्वनिप्रदूषणाची पातळी मोजली जात आहे. हे काम एका खासगी संस्थेला देण्यात आले आहे. या संस्थेने राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांच्या साह्याने ध्वनिप्रदूषण पातळी मोजण्यास सुरुवात केली आहे. दररोज सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ही पातळी मोजली जाते. ध्वनिप्रदूषणाची कमाल मर्यादा पातळी दिवसा ७५ डेसिबल आणि रात्री ७० डेसिबलपर्यंत आहे. शहरात सर्वच ठिकाणी आवाजाची पातळी ७५ ते ८५ डेसिबलदरम्यान नोंदविण्यात आली आहे. यामुळे गणेशोत्सवाच्या काळात शहरभर ध्वनिप्रदूषण होत असल्याची बाब उघडकीस आली आहे.

गणेशोत्सवातील वाढत्या ध्वनिप्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करीत असल्याच्या पार्श्वभूमीवर डॉ. कल्याणी मांडके यांनी लवादाकडे याचिका दाखल केली होती. यात राज्य सरकार, जिल्हाधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे महापालिका आणि पुणे पोलिसांना प्रतिवादी करण्यात आले होते. पुण्यात गणेशोत्सवादरम्यान ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती. यावर महाराष्ट्र प्रदूषण मंडळासह पुणे पोलिसांना ध्वनिप्रदूषण कमी करण्याचा आदेश देण्यात आला आहे. प्रत्येक गणेश मंडळाला १०० वॉटपेक्षा जास्त क्षमतेचे ध्वनिक्षेपक लावण्यास राष्ट्रीय हरित लवादाने बंदी घातली आणि ढोल-ताशा पथकात ३० पेक्षा जास्त वादकांचा समावेश करण्यास मनाई केली.

# शिक्षिकेची सामाजिक माध्यमांवर बदनामी करणाऱ्यास अटक

**भिवंडी, दि. ११ : प्रतिनिधी**

३२ वर्षीय शिक्षिकेचे ३४ वर्षीय तरुणाशी लग्न ठरलेले असतानाच शिक्षेकेस तरुणाच्या चारित्र्यावर संशय आल्याने शिक्षिकेने लग्नास नकार दिल्याने तरुणाने शिक्षिकेसह तिच्या कुटुंबियांना वारंवार संपर्क करून शिक्षिके सोबत काढलेला फोटो सामाजिक माध्यमांवर व्हायरल करून शिक्षिकेची बदनामी केल्याप्रकरणी तरुणास शहर पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,३२ वर्षीय शिक्षिका शहरातील कामतघर परिसरात राहत असून त्याच परिसरातील एका शाळेत मुलांची शिकवणी घेत आहे.तर ३४ वर्षीय तरुण मुंबईतील पश्चिम मध्ये राहत आहे.दरम्यान २८ मे २०२३ रोजी या दोघांमध्ये पिडीत शिक्षिकेच्या राहत्या घरी लग्नाच्या बेडीत अडकण्याचे निश्चित झाले होते.परंतु काही कालावधी नंतर शिक्षिकेला तरुणाच्या वर्तणुकीवरून त्याच्या चारित्र्यावर संशय येवून पीडितेने तरुणाला लग्नास नकार दिला.तर लग्न निश्चित होतेवेळी पीडित शिक्षिकेने तरुणासोबत तरुणाच्या मोबाईल मध्ये फोटो काढला होता.त्याचाच फायदा घेत आरोपी तरुणाने इंस्टाग्राम आणि फेसबुक वर पिडीत शिक्षिकेच्या नावाने बनावट अकाऊंट तयार करीत पिडीते सोबतचा फोटो प्रसारीत करून शिक्षिकेची बदनामी केली आहे.यासह तक्रारदार शिक्षिकेने लग्नास नकार देवूनही तरुणाने शिक्षिकेला फोन करून अश्लील संभाषण करण्यासह तिच्या कुटुंबीयांना वारंवार त्रास दिल्याचे पीडित शिक्षिकेने तक्रारीत म्हंटले आहे.याप्रकरणी ९ सप्टेंबर रोजी पीडितेच्या फिर्यादीवरून आरोपी तरुणाच्या विरोधात शहर पोलीस ठाण्यात भान्यासं कलम ७४,७८,३५६(३) सह आयटी कलमान्वये गुन्हा दाखल करून तरुणास सोमवारी रात्री अटक केली.

# भाजपाचे खापरी येथील कार्यकर्ते शिवसेनेत दाखल

**मुरबाड, दि. ११ : प्रतिनिधी**

तालुक्यातील खापरी ग्रामपंचायतीतील सदस्य व गावातील भाजपाच्या युवा कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख सुभाष गोटीराम पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून कार्यकर्त्यांनी भगवा झेंडा हाती घेतला. या वेळी शिवसेना तालुकाप्रमुख प्रकाश पवार व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य संजय पवार उपस्थित होते. माजी आमदार गोटीरामभाऊ पवार व शिवसेनेचे भिवंडी लोकसभा सहसंपर्कप्रमुख सुभाष पवार यांना खापरी ग्रामपंचायतीत पदाधिकारी व ग्रामस्थांकडून कायम साथ देण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सक्षम नेतृत्वाखाली मुरबाड तालुक्यात विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यातून विकासकामे सुरू असून, ग्रामस्थांना सुविधा उपलब्ध होणार आहेत, अशी माहिती शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख सुभाष पवार यांनी दिली. खापरी, कामतपाडा, वैतागवाडी कामतपाडावाडी भागात झालेल्या विकासकामांसाठी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्षपदी असताना सुभाष पवार यांनी पुढाकार घेतला होता, याचा आवर्जून उल्लेख उपसरपंच सुरेश भांगरथ यांनी केला. तसेच खापरी येथील अरुण सीताराम राऊत, पांडुरंग राऊत, कपिल राऊत यांच्यासह ४० ते ५० कार्यकर्त्यांचे भाजपामधून शिवसेनेत स्वागत केले.

# गणेशोत्सवात रक्तदान शिबिराचे आयोजन,197 रक्तदात्यांनी केले रक्तदान

**भिवंडी, दि. ११ : प्रतिनिधी**

गणेशोत्सव साजरा होत असताना अनेक सामाजिक उपक्रम आयोजित करून सामाजिक भान जपणाऱ्या धामणकर नाका मित्र मंडळ स्वाभिमान सेवा संस्थेच्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडपात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. आमदार संजय केळकर यांच्या शुभहस्ते या रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.या प्रसंगी पालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके,ठाणे परिवहन समिती सदस्य विकास पाटील,संस्थाध्यक्ष संतोष शेट्टी,संस्थेचे पदाधिकारी हसमुख पटेल,राजेश शेट्टी,संजय शहा,मोहन बल्लेवार,तारु जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.धामणकर नाका मित्र मंडळाने गणेशोत्सव काळात रक्तदान सारख्या महादान कार्यक्रमाचे आयोजन करून समजा समोर चांगला पायंडा पाडला आहे, अशा शुभेच्छा देत या कार्याचा शुभारंभ करण्याचा बहुमान मला सतत सहाव्या वर्षी मिळत असल्या बद्दल आमदार संजय केळकर यांनी समाधान व्यक्त केले.ठाणे येथील कै.वामनराव ओके रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित या रक्तदान शिबिरात सायंकाळी पाच वाजेपर्यंत एकूण १९७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. याप्रसंगी सर्व रक्तदात्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले.तर रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी रक्तदान समिती प्रमुख राकेश पटवारी यांच्या नेतृत्वाखालील चंद्रकांत हेगडे, ॲड.नंदन गुप्ता,महिदिप चौहाण,संजय नाईक,महेश मिश्रा यांनी विशेष मेहनत घेतली.



# श्रीराम मंदिर सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळाचे यंदा शतकोत्तर 27 वे वर्ष

**जव्हार, दि ११ : प्रतिनिधी**

जव्हार येथील श्रीराम मंदिर सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळाचे यंदा शतकोत्तर 27 वे वर्ष आहे. महाराष्ट्रातील प्रमुख गणेशोत्सवातील शंभर वर्षे पूर्ण करणारे हे गणेश मंडळ आहे. मानाचा गणपती म्हणून ख्याती आहे.उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे लोकमान्य टिळकांनी 1893 साली कसबा पेठेतील गणपतीची स्थापना करून गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्यांनंतर 4 वर्षांनी म्हणजेच 1898 साली जव्हार संस्थांचे नरेश यशवंतराव मुकणे महाराज यांनी जव्हारमध्ये हा उत्सव थाटामाटात सुरू केला. त्यावेळेसच्या ग्रुप आणि उत्साह आज देखील या उत्सवात कायम आहे. यंदा मंडळाचे अध्यक्ष सूरज वाघ यांच्या नेतृत्वात उत्सव अधिक भव्य दिव्य होणार असल्याचे बोलले जात आहे.

नव्वदच्या दशकापासून उत्सवाला थोडीशी उतरती कळा लागली होती, म्हणजे महिलांनी उत्सव ताब्यात घेतला होता. नंतर, काही वर्ष हा उत्सव माघी गणेश उत्सव स्वरूपात साजरा करण्यात आला होता. त्याची स्थापना गांधी चौक येथे होत होती, पण तद्नंतर दिवंगत दिनेश भट यांच्यासारखं तरुण नेतृत्व उत्सवाला लाभलं, आणि बघता बघता उत्सवाचं खूप मोठ्या स्वरूपात रूपांतर झाले, त्यावेळी त्यांच्या समवेत संदीप वैद्य, प्रशांत ओक, नवनीत जोशी, हर्षद मेघपुरीया,भरत बेंद्रे, अरविंद तंत्रि, राजु अंभिरे, अविनाश काळे अजून बरेच युवा तरुण होते .लालबागच्या राजाचा जसा बोलबाला आहे नवसाला पावतो तसाच येथील सार्वजनिक श्री गणेशोत्सव मंडळ,जव्हार या ठिकाणी असलेल्या मयूरेश्वराचा देखील बोलबाला असल्याचे सांगण्यात येते.

सन 1998 साली या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची शंभरी पूर्ण झाली, शंभर वर्षाचे कार्यक्रम साजरे करत असताना त्यामध्ये जव्हार



अनिवासी जव्हारकर यांचा संमेलन भरवण्यात आलं होतं तसेच ढोल ताशांच पथक पहिल्यांदा जव्हार मध्ये आणलं होतं.या उत्सवात अबाल वृद्ध व महिला अशांसाठी भरगच्च असे कार्यक्रम दहा दिवसात राबविण्यात येतात. वस्तू ओळखणे ,स्मरणशक्ती ,चमचा लिंबू ,बुद्धी वाढणारे खेळ तर महिलांसाठी सुगरण कौशल्य, होम मिनिस्टर ,बाई पण भारी देवासारखे महिलांसाठी कार्यक्रम तसेच पालघर जिल्हात व जव्हार परिसरात असामान्य अशी कामगिरी केलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान सोहळा कर्तृत्ववाचा झेंडा रोविला असा साजरा करतो. अशा नानाविध स्पर्धांनी भरलेला असा हा उत्सव त्यामध्ये मुलांच्या अंतर्गुणांना म्हणजेच नाच, नृत्य, गायन अभिनयाला देखील वाव मिळतो अशा या उत्सवाला आजपर्यंत दिवंगत धर्मवीर आनंद दिघे तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब अशा महान व्यक्तींनी देखील भेट दिली आहे.

दरम्यान, उत्सवात आरोग्यासाठी साठी मोफत आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिर आयोजित केली जातात. आजपर्यंत या उत्सवाला अनेक जिल्हा व तालुका स्तरीय पारितोषिक मिळालेली आहेत यंदा उत्सवाचे 127 वे वर्षे साजरे होत असून या वर्षीचे अध्यक्ष सुरज वाघ आणि त्यांची कार्यकारणी ही देखील तितक्याच उत्साहाने जोमात काम करत आहे. येथील गणेशोत्सव हा लोकमान्य टिळकांना प्रेरित आणि अपेक्षित असा उत्सव असतो.

# पीकविम्याच्या पैशासंदर्भात शेतकरी आक्रमक

## कृषि अधिकाऱ्यांकडे तक्रार, नुकसानग्रस्तांना डावलल्याचा शेतकऱ्यांचा आरोप



■ **महासागर प्रतिनिधी,**
**चिखली , दि. ११ :** चिखली विमा कंपनीने शेतकऱ्यांना मागील हंगामाच्या पिकविम्याचे पैसे टाकण्यामध्ये भेदाभेद केला असून अनेकांची नावे पिकविम्याच्या यादीत असूनही त्यांना मात्र पैसे टाकण्यात आले नाही.ज्यांच्या शेतात पिकेच नाही त्यांना कंपनीने लाभ दिला. मात्र नुकसानग्रस्ताना डावलण्यात आल्याचा आरोप कृषिअधिकारी सवडतकर यांच्यासमक्ष शेतकऱ्यांनी केला. सोमवारी शेकडो शेतकरी शेतीची कामधंदे सोडून पिकविम्याच्या चौकशी साठी चिखली येथील तालुका कृषी कार्यालयामध्ये रामनगर, मकरध्वज खंडाळा, येवता, भरोसा, देऊळगाव घुबे, करवंड अशा विविध गावातील शेतकरी गोळा झाले होते. अनेकांना मगिलवर्षाच्या सोयाबीन,तूर, हरबरा या पिकविम्याचा लाभ न मिळाल्याच्या तक्रारी घेऊन आले होते. शेतकरी पाहून विमा कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी कार्यालय बंद करून तेथून पसार झाले होते म्हणून शेतकऱ्यांनी कृषी कार्यालय गाठले मात्र तेथे कर्मचाऱ्यांची मिटींग सुरू असल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली मिटींग सुटल्यानंतर कृषी अधिकारी सवडतकर साहेब यांच्या दालनात शेतकऱ्यांनी गर्दी करून आपली गाऱ्हाणी मांडली. मागील वर्षी कंपनीकडून नुकसानीचा सर्व्हे करण्यासाठी आलेल्या मुलांनी शेतकऱ्यांकडून पैसे घेतल व शेतात न जाता गावात बसून सर्व्हे केले असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला पैसे दिलेल्या शेतकऱ्याचे नुकसान झालेले नसताना त्यांना नुकसानभरपाई मिळाली मात्र नुकसान होऊनही आपणाला वंचित ठेवण्यात आले असल्याचे एका महिलेने सांगितले. त्यामुळे पैसे खाऊन कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी हद्द केली. दोन्ही बाजूच्या शेतकऱ्याना पिकविम्याचा लाभ देण्यात आला तर दोघांच्या मधील शेतकऱ्याला वंचित ठेवले गेले असे मकरध्वज खंडाळा येथील शेतकऱ्यांने सांगितले. त्यामुळे कृषी अधिकारी सवडतकर यांनी यावर्षी कृषी विभागाचे कर्मचारी कंपनीच्या कर्मचाऱ्यांसोबत गावात जाऊन सर्व्हे करतील आणि ज्याने कुणी शेतकऱ्यांकडून पैसे घेतले त्यावर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात येईल असे आश्वासन त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिले.

# वक्फ दुरुस्ती विधेयक म्हणजे वक्फ मालमत्ता हडप करण्याचे षडयंत्र

**जमाअतएइस्लामी हिंदचा आरोप; सरकारने विधेयक मागे घ्यावे**




■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. ११ ::** लोकसभेत मांडण्यात आलेले वक्फ दुरुस्ती विधेयक सरकारने मागे घ्यावे. हे विधेयक म्हणजे वक्फची मालमत्ता हडप करण्याचा डाव आहे, असा आरोप जमाअत-एइस्लामी हिंदचे प्रदेशाध्यक्ष इलियास फलाही यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत केला.

वक्फ संरक्षण आणि पारदर्शकतेच्या नावाखाली वक्फ मालमत्ता पाडण्याचा आणि बळकावण्याचे कारस्थान आहे, असे जमाअत-ए- इस्लामी हिंदचे पदाधिकारी म्हणाले. प्रस्तावित विधेयकात वक्फची व्याख्या, मुतवल्लीचा दर्जा आणि वक्फ बोर्डाचे अधिकार यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. या अंतर्गत केंद्रीय वक्फ परिषद आणि वक्फ बोर्डाच्या सदस्यांची संख्या वाढवण्याच्या नावाखाली बिगर मुस्लिमांना सक्तीचे सदस्य बनविण्याचा प्रस्ताव आहे. सेंट्रल वक्फ कौन्सिलमध्ये गैर-मुस्लिम सदस्यांची संख्या पर्यंत असू शकते. त्यापैकी दोन सदस्य अनिवार्य असतील. तसेच वक्फ बोर्डात बिगर मुस्लिम सदस्यांची संख्या पर्यंत असू शकते, त्यापैकी दोन सदस्य अनिवार्य असतील. प्रस्ताव संविधानातील तरतुदींचे उल्लंघन करणारा आहे, असेही जमाअत-एइस्लामी हिंदचे प्रदेशाध्यक्ष इलियास फलाही म्हणाले. या पत्रकार परिषदेला डॉ. अहमद उरूज मुदासीर, सैय्यद नदीम, मुफ्ति मो. अशपाक कासमी आदी होते.

सर्व धार्मिक ट्रस्ट आणि व्यवस्थापन समित्यांचे सदस्य आणि जबाबदार व्यक्ती हे हिंदू, शीख किंवा इतर धर्माचे असणे बंधनकारक आहे. मात्र वक्फ बोर्डामध्ये गैर-मुस्लिमांचा समावेश अनिवार्य प्रस्तावित करण्यात आला आहे, .

विधेयकात वक्फ बोर्डाच्या सीईओची मुस्लीम असण्याची अट काढून टाकण्यात आली असून हे पद यापुढे सहसचिव पदाच्या खाली नसावे, असा निर्णय घेण्यात आला आहे.

या विधेयकामुळे वक्फ मालमत्ता सरकारी ताब्यात घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. वक्फ मालमत्ता ताब्यात घेण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले असून वक्फ न्यायाधिकरणाचे अधिकारही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

या विधेयकामुळे वक्फ बोर्डाचे अधिकार कमी होतात आणि सरकारी हस्तक्षेप वाढतो, असेही जमाअत-एइस्लामीचे पदादिकारी म्हणाले.

# माणसाच्या जीवनातील खरे सुख भगवंताच्या भक्तीत

**सांगळुदकर'चे प्राचार्य डॉ. अतुल बोडखे यांचे प्रतिपादन**



■ **महासागर प्रतिनिधी,**
**दर्यापूर दि. ११ :** दर्यापूर माणसाच्या जीवनातील खरे सुख हे भगवंतांच्या भक्तीत आहे, ते केवळ धर्म प्रवर्तक नव्हते तर, ते समाजसुधारक ही होते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. अतुल बोडखे यांनी केले. दर्यापूर शहरामधील जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय येथे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन कार्यक्रम पार पडला. यावेळी कार्यक्रमाध्यक्ष म्हणून ते बोलत होते. मराठी विभागाचे प्रा. डॉ. विनोद कोकणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. बोडखे म्हणाले, सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या उपदेशात माणुसकीची भूमिका होती, त्यांनी आपल्या अनुयायांना शुद्ध विचार आणि साधेपणाने जीवन जगण्याचा उपदेश केला. खरा धर्म हा माणसाच्या अंत:करणात असतो. त्याच्या जीवनातील घटना आणि त्याचे तत्वज्ञान हे लिळाचरित्रातून दिसते. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि कर्मकांडांच्या विरोधात उभे राहून माणुसकीचे महत्त्व पटवून दिले. समाजातील जातिभेद, स्त्री-पुरुषभेद आणि धर्मांधतेविरोधात खंबीर भूमिका घेतली होती. त्यांनी जीवनात सत्य, अहिंसा आणि प्रेम याचे पालन करण्याचा उपदेश केला. त्यांनी समाजाच्या कल्याणासाठी केलेले कार्य अमूल्य असल्याची माहिती मराठी विभागाचे प्रा. डॉ. विनोद कोकणे यांनी दिली.

याप्रसंगी कला शाखा प्रमुख डॉ. नरेंद्र माने, वाणिज्य शाखा प्रमुख प्रा. डॉ. मंगलावती पाण्डेय, विज्ञान शाखा प्रमुख प्रा. डॉ. विजय येलकर तसेच आयक्यूएसी समन्वयक प्रा. मनीष होले आदी उपस्थित होते. या वेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रतिमेचे पूजन करताना सांगळुतकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल बोडखे.

# प्रिती ढाकरगेला पाच लाख रुपयांची क्रीडा शिष्यवृत्ती

**खेलो इंडिया खो-खो स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवणारी जिल्ह्यातील पहिली खेडाडू**



■ **महासागर प्रतिनिधी,**
**यवतमाळ , दि. ११ :** खेलो इंडीया अंतर्गत पार पडलेल्या खो-खोच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केल्याबद्दल प्रिती महेंद्र ढाकरगे हीला राज्य शासनाची ५लाख रुपयांची क्रीडा शिष्यवृत्ती नुकतीच प्राप्त झाली आहे. अशा प्रकारची क्रीडा शिष्यवृत्ती प्राप्त करणारी प्रिती ही जिल्ह्यातील पहिली खेळाडु आहे. ती स्थानिक अभ्यंकर कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थीनी व नवजयहिंद क्रीडा मंडळाची खेळाडू आहे.

प्रीती ही यंदा बारावी विज्ञान शाखेला शिकत आहे. ती गेल्या सहा वर्षापासून खो-खोखेळाचा सराव करत आहे. प्रीतीने २०२४मध्ये झालेल्या शालेय राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्र संघाकडून सहभाग घेऊन नाशिक येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेमध्ये सुवर्णपदक प्राप्त केले होते.

सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल तिला याच वर्षी राज्य शासनाचे १२हजार रुपये क्रीडा शिष्यवृत्ती प्राप्त झाली होती. त्यासोबतच सांगली येथे पार पडलेल्या खेलो इंडिया स्पर्धेची निवड चाचणी स्पर्धेतून प्रीतीची निवड राष्ट्रीय स्पर्धेकरीता झाली होती. तिने तामिळनाडू मधील मदुराई येथे संपन्न झालेल्या प्रतिष्ठेच्या खेलो इंडिया स्पर्धेमध्ये तीने महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व केले होते. त्या स्पर्धेत तिला सुवर्णपदक प्राप्त झाले होते. या प्रथम क्रमांकासह सुवर्णपदक प्राप्त झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य शासनाकडून तिला पाच लाख रुपयांची क्रीडा शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. प्रीतीने यापूर्वी अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेत त्या स्पर्धा गाजवल्या आहेत. खोखो क्रीडा प्रकारामध्ये उत्कृष्ट संरक्षकाचा बहुमानही तिला प्राप्त झालेला आहे. सोबतच ती उत्कृष्ट धावपटू सुद्धा आहे.

आतापर्यंत यवतमाळ जिल्ह्यात अशा प्रकारची आणि इतक्या मोठ्या रकमेची क्रीडा शिष्यवृत्त प्राप्त करणारी प्रिती पहिली खेळाडू ठरली आहे. शासनाच्या वतीने मिळालेल्या या शिष्यवृत्तीसाठी प्रिती आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, वुमेन्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. ए. पी. दर्डा, सचिव रमेश मुनोत, शाळेच्या मुख्याध्यापिका मोहना गंगमवार, उपमुख्याध्यापक तथा प्रशिक्षक अविनाश जोशी, क्रीडा शिक्षक संजय बड्डावार, नव जयहिंद क्रीडा मंडळाचे प्रदीप वानखेडे, अमोल बोदडे, जुमु लालुवाले, पंकज रोहनकर, आशिष प्यारलेवार, कैलास शिंदे, यवतमाळ जिल्हा खो-खो संघटनेचे अध्यक्ष राजू घावडे, सचिव विकास टोणे यांना दिले आहे. तिच्या यशाचे कौतूक केले जात आहे. खो-खो सांघीक खेळ आहे. त्यामुळे या खेळामध्ये मला यश मिळाले असले तरी ते माझ्या एकटीचे ते यश नसून माझ्यासोबत खेळणाऱ्या सर्व सहकारी खेळाडुंचे हे यश आहे. त्यांनीही अशीच मेहनत केल्यास हे यश त्यांना मिळू शकते. खेलो इंडीया स्पर्धा ही नवोदीत खेळाडुंसाठी उत्तम संधी आहे. भविष्यात मला भारताच्या संघाकडून खेळण्याची इच्छा असून त्यासाठी अथक प्रयत्न करणार आहे. -प्रिती ढाकरगे, खो-खो खेळाडू.

# २ वर्षात २६९ किलोमीटरचे काँक्रीट रस्ते तयार करण्याचे उद्दिष्ट्य

**जिल्ह्यातील ५९ रस्त्यांच्या दर्जोन्नतीसह २६२ कोटी ३२ लाख रुपये निधी मंजूर**



■ **महासागर प्रतिनिधी,**
**यवतमाळ, दि. ११ :** जिल्ह्यातील ग्रामीण भागांमध्ये पसरलेल्या महत्वाच्या रस्त्यांपैकी अनेक रस्ते जास्त वर्दळीचे आहेत. अशा महत्वाच्या आणि वर्दळीच्या तब्बल ५४ रस्त्यांची दर्जोन्नती करण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर हे २६४ किलोमीटरचे रस्ते येत्या २ वर्षात काँक्रीटचे करण्याचे उद्दीष्ट ठेवून त्यासाठी२६२ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांचे रुपडे काही वर्षात पालटलेले दिसून येणार आहे.

यवतमाळ जिल्हा भौगोलीक दृष्ट्या खूप मोठा आहे. विस्तीर्ण भागात पसरलेल्या जिल्ह्यात अनेक भागातून राष्ट्रीय आणि राज्य महामार्ग गेलेले आहेत. या महत्वाच्या मार्गांना ग्रामीण भागासोबत जोडण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात रस्त्यांचे मोठे जाळे पसरलेले आहे. गेल्या काही वर्षात ग्रामीण भागातील नागरिक रोजगार, शिक्षण, शासकीय कामे अशा महत्वाच्या अनेक कामांसाठी तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी येण्याचे प्रमाण वाढले आहे. दळण-वळणाच्या सुविधा वाढल्याने रस्त्यावरुन ये-जा करणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. या सर्व कारणांमुळे जिल्ह्यातील प्रमुख रस्त्यांपैकी वर्दळ अधीक असलेल्या ५४ रस्त्यांना दर्जोन्नती देण्यात आली आहे. त्यासंदर्भात ग्राम विकास विभागाने शासन निर्णय निर्गमीत केला आहे.

या दर्जा उन्नत करण्यात आलेल्या ५४ रस्त्यांची लांबी २६४ किलोमिटर इतकी आहे. हे सर्व रस्ते चांगले व्हावे यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा १ अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी २६२ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आता ग्रामिण भागातील नागरिकांना याचा चांगला फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे. ग्रामीण भागातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण झाल्यास ग्रामीण भागात चांगल्या दर्जाच्या रस्त्यांचे जाळे पसरणार आहे. या रस्त्याने मुख्य मार्ग जोडल्या जावून नागरिकांना प्रवासासाठी गुळगुळीत रस्ते उपलब्ध होणार आहे. चांगल्या रस्त्यांमुळे नागरिकांना प्रवासासाठी लागणाऱ्या वेळेची बदच देखील होणार आहे. श्री. मंत्री, कार्यकारी अभियंता, पीएमजीएसवाय. ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा ग्रामीण भाग मुख्य रस्त्यांशी जोडणाऱ्या ५४ रस्त्यांची दर्जोन्नती करण्यात आली आहे. त्यामुळे या रस्त्यांचे काँक्रीटीकरणही करण्यात येत आहे. त्याचा फायदा ग्रामीण भागात या रस्त्यांवर जोडल्या गेलेल्या नागरिकांना होणार आहे. सोमवारी रात्री लग्नाचे कपडे खरेदीसाठी गेलेल्या वाहनाचा आर्णी तालुक्यातील कोसदनी घाटात झालेल्या स्कार्पीओ वाहनाच्या अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. या अपघात झालेल्या वाहनात नवीन खरेदी केलेले सामान व मृतकाच्या गळ्यातील पोत महामार्ग पोलिसांनी आर्णी ग्रामीण रुग्णालयात मध्यरात्रीला जाऊन नारलावार कुटुंबियांच्या स्वाधीन केली. नागपूर-तुळजापूर महामार्गांवरील अपघाताची मालिका थांबायचे नाव घेत नसून आर्णी तालुक्यात महामार्गावरील अपघाताने पाच दिवसात तीन बळी घेतले आ सप्टेंबर रोजी कोसदनी घाटातील वळणात एका बोलेरो पिकअप वाहनाने उभ्या ट्रकला धडक दिली असता, या अपघातामध्ये नांदेड येथील भगवान पवार यांचा मृत्यू झाला, दि. ४ सप्टेंबर रोजी आर्णी शहरानजिक असलेल्या पेंटर बाबा दरगाह जवळ दुचाकी डीवायडरला धडकल्याने जवळा येथील प्रमोद पंचभाई याचा जागीच मृत्यू झाला.

वारंवार डागडुजीचा करण्याचा त्रास कमी ग्रामीण भागातील रस्ते प्रामुख्याने डाबरी असतात. मात्र मुसळधार पावसाने अवघ्या काही महिन्यातच त्या रस्त्यांची दुर्दशा होते. बऱ्याच ठिकाणी रस्त्याचे काम करताना त्याच्या दर्जाकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे हे रस्ते वारंवार डागडुजी करावे लागतात. मात्र आता थेट काँक्रीटचे रस्ते तयार करण्यात येणार असल्याने रस्ते नादुरूस्त होण्याचे आणि त्यांची वारंवार डागडुजी करण्याचा त्रास कमी होणार आहे.

ग्रामीण भागातील दळणवळणाला गती मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ अंतर्गत मंजुर करण्यात आलेल्या या निधीतून सर्व ५४ रस्ते काँक्रीटचे तयार करण्यात येणार आहे. ही कामे येत्या २ वर्षात पुर्ण करण्याचे उद्दीष्ट्य ठेवण्यात आली आहेत. सुमारे १३ फुट रुंद हे रस्ते राहणार आहेत.

या रस्त्यांच्या कामांना मंजुरी मिळताच पंतप्रधान ग्राम सडक योजना विभागाच्या वतीने या रस्ते बांधकामाची निवीदा प्रक्रीया राबवण्यात येत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात ही कामे प्रत्यक्षात सुरू होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ग्रामीण भागातील रस्ते अशा प्रकारे काँक्रीटचे झाल्यास ग्रामीण भगातील दळणवळणाला गती मिळणार आहे.

# केळझर सिध्दिविनायक मंदिरात दर्शनासाठी भाविकांची रिघ

**.....विदर्भाच्या अष्टविनायकांपैकि एक म्हणुन प्रसिध्द.**



**संजय धोंगडे**
**सेल, दि. ११: :** विदर्भाच्याअष्टविनायकांपैकी एक म्हणुन केळझरचा सिध्दीविनायक प्रसिद्ध आहे. गणेशोत्सव निमित्त येथील मंदिरात चतुर्थी पासून भाविकांची दर्शनाकरीता मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे

हे जिल्ह्यातील जागृत श्री गणेशाचे मंदिर असून विदर्भाच्या अष्टविनायकापैकी एक असल्याने विदर्भात सर्वदूर सुपरिचित आहे. केळझर नागपूरवरून ५२किलोमीटर तर वर्ध्याहून २६किलोमीटर अंतरावर टेकडीच्या कुशीत वसलेले आहे. मंदिर वर्धा-नागपूरमुख्य मार्गावर अंदाजे एक फर्लांग अंतरावर उत्तरेकडे उंच टेकडीवर वसलेले आहे. मंदिराकडे जाणारा रस्ता गावातून असून रस्तादर्शक फलक मुख्य मार्गावरच लावण्यात आलेला आहे.

वशिष्ठ पुराणाप्रमाणे या गावाचे नाव एकचक्रनगर असल्याचा वशिष्ठ पुराण आणि महाभारतात उल्लेख आढळतो. वशिष्ठ पुराणाप्रमाणे श्रीरामचंद्र प्रभूचे गुरू श्री वशिष्ठ ऋषी यांचे वास्तव्य असल्याची नोंद असून वशिष्ठ ऋषींनी स्वत:च्या भक्ती व पूजेकरिता या गणपतीची स्थापना केल्याचा उल्लेख आहे. त्यानंतर त्याच काळात वर्धा नदीच्या निर्मितीचा उल्लेख आहे. पुराणाप्रमाणे या गणपतीचे नाव 'वरदविनायक' असून वर्धा नदीचे 'वरदा' असे नाव आहे. हा काळ श्रीरामजन्माच्या पूर्वीचा असून रामजन्मानंतर श्री वशिष्ठऋषींनी येथील वास्तव्य सोडले.

या .गावात कुंतीपुत्र पांडव एकचक्रनगरात वास्तव्याला . असताना बकासूर नावाच्या राक्षसाला मारल्याचा उल्लेख महाभारतामध्ये असून ते ठिकाण वर्धा नागपूर मुख्य मार्गावर गावाच्या आग्नेय बाजूला बौद्ध विहारासमोर बकासूर, तोंड्या राक्षसाचे मैदान म्हणून प्रचलित आहे. याच टेकडीवर श्री गणपतीचे मंदिर आहे. टेकडी निसर्गरम्य असून वाकाटकाच्या काळापासून एक भव्य किल्ल्याचे ठिकाण होते. त्या किल्ल्याला पाच बुरुज होते. तीन माती-दगडांनी बांधलेले भव्य परकोट होते. पहिल्या आणि दुसऱ्या परकोटाच्या आत चौकोनी सुंदर व भव्य अशी विहीर असून त्याला 'गणेशकुंड' या नावाने ओळखले जाते. असंख्य भाविक त्याचा तीर्थ म्हणूनही वापर करतात. वाकाटकानंतर प्रवर्शन राजाचे हे गाव मुख्यालय असल्याची इतिहासात नोंद आहे. भोसलेराजे कोल्हापूरवरून नागपूरला स्थलांतरित होण्यापूर्वी त्यांचा केळझरला मुक्काम झाल्याची नोंद आहे. केळझरस्थित वरदविनायक श्री गणपतीची मूर्ती चार फूट सहा इंच उंच असून व्यास १४ फूट आहे. १४४३ ला या मंदिरात जीर्णोद्धाराच्या कामास सुरुवात झाली.

१४४४ मध्ये महाशिवरात्रीच्या अगोदर खोदकामात शिवलिंग मिळाले. याविषयी शिवलीला अमृताच्या अखेरच्या अध्यायात एकचक्रनगरात ज्योर्तिलिंग असल्याची नोंद आहे. याच गावात जैन पंथाचे आठवे तीर्थंकर चंद्रप्रभू स्वामींची सुरेख मूर्ती मिळाली. ती आठव्या शतकातील असावी, अनन्यसाधारण आहे.

**विदर्भातील कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने भाविक येथे दर्शनासाठी येतात येवुन नवसाला पावणारा गणपती म्हणून या गणपतीची ओळख आहे .नवसाला पावणारा हा गणपती असल्याने भाविक मोठ्या आनंदाने वरदविनायका जवळ येऊन नवस पूर्ण करतात .**

**गणेश उत्सवानिमित्त दहा दिवस मंदिरात रोशनाई केल्या गेली असून . रोशनाई सर्वाचे लक्ष वेधुन घेणारी ठरत आहे यावर्षी टाळ,विणा ,भागवत ,भजन किर्तन आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . अनंत चतुर्दशीला महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला असून भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन मंदिराचे अध्यक्ष माधव ईरुटकर सचिव महादेव कापसे आणी समितीने केले आहे.**

# तीन गावांतील महिला दारू विक्रीच्या तक्रारीसाठी ट्रॅक्टरने पोहचल्या ठाण्यात



■ **महासागर प्रतिनिधी,**
**गडचिरोली,दि. ११ :** तालुक्यातील बाम्हणी, भगवानपूर, मोहडोंगरी येथील महिलांनी तिन्ही गावात सुरू असलेल्या दारू विक्री विरोधात तक्रार दाखल करण्यासाठी मंगळवारी गडचिरोली पोलिस स्टेशन गाठून आमच्या गावातील अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी केली. विशेष म्हणजे या महिलांनी आपल्या गावापासून गडचिरोली पोलिस ठाण्यापर्यंतचा प्रवास ट्रॅक्टरने केला. बाम्हणी ग्रामपंचायत अंतर्गत मोहडोंगरी, बाम्हणी व भगवानपूर या गावांमध्ये सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीमुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. या तिन्ही गावांमध्ये दारू विक्री होत असल्याने परिसरातील गावांना देखील याचा त्रास सहन करावा लागत आहे. गावांमध्ये दारू व्यसनाचे प्रमाण वाढत असल्याने गावातील दारू विक्री थांबविण्यासाठी मुक्तीपथ गाव संघटन प्रयत्न करीत आहे. गावातील महिलांनी अहिंसक कृतीच्या माध्यमातून दारू विक्रेत्यांचा मोहफुलाचा सडवा व साहित्य नष्ट करून अवैध धंदे बंद करण्याची ताकीद दिली. तसेच आतापर्यंत पोलिस विभागाच्या माध्यमातून या परिसरातील दारू विक्रेत्यांवर कारवाई देखील करण्यात आली आहे. तरीसुद्धा संबंधित गावातील काही दारूस विक्रेत्यांनी आपला अवैध व्यवसाय सुरूच ठेवला आहे. ही गंभीर समस्या लक्षात घेता तिन्ही गावातील लोकांनी आपल्या गावात दारू विक्री बंदीचा निर्णय घेतला.

साहेब, आमचे गाव दारूमुक्त करा मोहडोंगरी, बाम्हणी व भगवानपूर या तीनही महिलांनी गडचिरोली पोलिस स्टेशन गाठून पोलिस निरीक्षकांच्या नावे निवेदन सादर केले. आपल्या गावात अवैध दारू विक्रीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या मांडल्या. गावातील विक्रेत्यांवर कारवाई करून आमचे गाव दारू मुक्त करण्यासाठी पुढाकार घ्या, अशी मागणी महिलांनी पोलिसांकडे निवेदनातून केली.

**जाहीर नोटीस**

**टी.सी. हरवली आहे**

**माझे नाव सतीश मानसिंग जाधव, रा. गाव - शिवनगर, तांडा येथे आहे. माझ्या शाळेचे नाव श्री. सत दासगुन महाराज माध्यामिक आश्रम शाळा उमरी असे आहे. माझी १० व १२ वी पास असलेली टि. सी. चि बॅग भोकर ते उमरखेड रोड वर हरवली आहे. जर कोणाला भेटल्यास खालील नंबर वर संपर्क करावा, ही विनंती.**
**मो. - सतीश- 8390636218**

**जाहीर नोटीस**

**टी.सी. हरवली आहे**

**माझे नाव किशोर रावसिंग राठोड, रा. गाव धारजणी (कु) तांडा येथे आहे. माझ्या शाळेचे नाव श्रि सं.दा.म.मा.आश्रम शाळा उमरी असे आहे. माझी १० व १२ वी पास असलेली टि. सी. चि बॅग भोकर ते हिमायतनगर रोड वर हरवली आहे. जर कोणाला भेटल्यास खालील नंबर वर संपर्क करावा, ही विनंती.**
**मोब. नंबर - 8421882183**




# ‘स्त्री २’ चा धमाका

‘स्त्री २’ सातत्याने विक्रम मोडतोय. तिसऱ्या आठवड्यात या चित्रपटाने ७० कोटी रुपयांहून अधिक कमाई केली असून अशी कामगिरी करणारा हा पहिलाच हिंदी चित्रपट आहे. या प्रवासात ‘स्त्री २’ ने ‘गदर २’ च्या कमाईला मागे टाकले आहे. त्यामुळे आता हा चित्रपट अजून कोणते विक्रम मोडणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागून राहिलं आहे. बॉक्स ऑफिसवर ‘स्त्री २’ ची जादू कायम असल्याचं दिसून येत आहे. चित्रपटाने २० दिवसांमध्ये ५१५.०५ कोटी रुपये कमावले. प्रदर्शनानंतर २० दिवसांमध्ये सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या यादीत ‘स्त्री २’ ने दुसरा क्रमांक पटकावला असून जवान पहिल्या क्रमांकावर आहे. ‘जवान’ला मागे टाकायला ‘स्त्री २’ ला फक्त १९ लाख रुपये कमी पडले. मात्र या प्रवासात ‘स्त्री २’ ने ‘ॲनिमल’, ‘पठाण’, ‘गदर २’ सारख्या चित्रपटांना मागे टाकले आहे. ‘स्त्री २’ ने बुधवारी ५.७० कोटी रुपये कमावले. म्हणजेच तिसऱ्या आठवड्यात या चित्रपटाने एकूण ७२.८३ कोटी रुपये कमावले. चित्रपटाचा बावीस दिवसांच्या कमाईचा आकडा ५२६.४३ कोटी रुपयांवर पोहोचला असून चित्रपटाने ‘गदर २’ च्या एकूण कमाईला मागे टाकलं आहे. ‘गदर २’ ने ५२५.५० कोटी रुपये व्यवसाय केला होता. ‘स्त्री २’ ने जगभरात ७०० कोटी रुपयांहून अधिक व्यवसाय केला असून ‘गदर २’ ने जगभरात ६८५.१९ कोटी रुपये कमावले होते. त्या आघाडीवरही ‘स्त्री २’ ने ‘गदर २’ ला मागे टाकले आहे. ‘स्त्री २’ ने बॉक्स ऑफिसवर तीन आठवडे पूर्ण केले असून तिसऱ्या आठवड्यातही चित्रपट दणकून कमाई करतो आहे. अन्य बॉलिवूडपट पहिल्या आठवड्यात चांगला व्यवसाय करण्यासाठी धडपडत असताना ‘स्त्री २’ ने तिसऱ्या आठवड्यात कमाल केली आहे. तिसऱ्या आठवड्यात ७० कोटी रुपयांहून अधिक कमाई करणारा ‘स्त्री २’ हा पहिलाच हिंदी चित्रपट ठरला आहे. ‘स्त्री २’ बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत होती. मात्र चित्रपटाने अनेक विक्रम मोडले असून नवे विक्रम प्रस्थापित केले आहेत. येत्या काळात हा चित्रपट अजून कोणते विक्रम प्रस्थापित करणार, याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिले आहे. दरम्यान, थलपती विजयच्या ‘ग्रेटेस्ट ऑफ ऑल टाईम’ला तेलगू भाषिक राज्यांमध्ये अपयशाला सामोरे जावे लागले आहे.



चित्रपटाने तमिळनाडू तसेच अन्य राज्यांमध्ये चांगली कमाई केली असली तरी आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये या चित्रपटाला मोठा धक्का बसला आहे. या दोन्ही राज्यांमध्ये थलपती विजयच्या चाहत्यांची संख्या खूप मोठी आहे. मात्र चित्रपटाला गर्दी खेचण्यात अपयश आलं आहे. सध्या या अपयशाची कारणमीमांसा सुरू आहे. मात्र अन्य राज्यांकडून चित्रपटाला बऱ्याच

# आलियाचा ‘अल्फा’



मुलगी राहाच्या जन्मानंतर आलिया भट्ट पुन्हा जोमाने कामाला लागली आहे. तिचा ‘जिगरा’ लवकरच प्रदर्शित होणार असून त्यानंतर ती ‘अल्फा’मध्ये दिसणार आहे. या चित्रपटासाठी ती बराच घाम गाळते आहे. या चित्रपटात आलिया ॲक्शन करताना दिसणार आहे. त्यासाठी ती जीममध्ये व्यायाम करते आहे. सध्या आलिया भट्टचा एक व्हिडिओ झपाट्याने व्हायरल होतो आहे. यात ती जीममध्ये व्यायाम करताना दिसते आहे. सध्या ती ‘अल्फा’ या चित्रपटाच्या शूटमध्ये व्यस्त आहे. तिचा ‘जिगरा’ हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे. हा ‘यशराज’चा ‘स्पाय युनिव्हर्स ’चित्रपट असून त्यात ती शर्वरी वाघसोबत दिसणार आहे. या चित्रपटात ती ॲक्शन करताना दिसणार आहे. मध्यंतरी आलिया काश्मीरहून परत आली आणि त्यानंतर कामाला लागली. आलियाचा वर्कआउट करतानाचा पाठमोरा व्हिडिओ तिच्या ट्रेनरने शेअर केला आहे. आलियाच्या व्हिडिओला सगळ्यांनी पसंतीची पावती दिली आहे. मुलगी राहाच्या जन्मानंतर आलिया पुन्हा एकदा कामाला लागली आहे. ‘अल्फा’मधल्या भूमिकेसाठी ती स्वतःला तयार करते आहे आणि प्रचंड मेहनत घेते आहे. गेल्या शुक्रवारी आलियाने इन्स्टा हॅण्डलवर फोटो शेअर केला होता आणि त्यात ती शर्वरी वाघ सोबत दिसली होती. या फोटोमध्ये दोन्ही अभिनेत्री कॅमेऱ्याकडे पाठ करून उभ्या आहेत आणि त्यांनी हाताने हार्टचा आकार केला आहे. त्यामुळे या दोन्ही अभिनेत्री ‘अल्फा’साठी खूपच उत्सुक आहेत. ‘अल्फा’ या चित्रपटात आलिया एका सीक्रेट एजंटच्या भूमिकेत दिसणार आहे. चित्रपटात बॉबी देओलही महत्त्वाच्या भूमिकेत दिसेल. त्यामुळे या चित्रपटाबद्दल आलियाच्या चाहत्यांना उत्सुकता आहे.

# ट्रेंड रि-रिलिजचा

आज ओटीटी माध्यमांवर जुने चित्रपट पहायला मिळतात. मात्र अनेकांना हे चित्रपट चित्रपटगृहांमध्ये पाहण्याची इच्छा असते. आता ती संधी मिळू लागली आहे. अनेक जुने चित्रपट पुन्हा प्रदर्शित होत आहेत आणि त्यांना प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटगृह मालकांसाठी हा फायद्याचा सौदा ठरत आहे. सध्या बॉलिवूडमध्ये रि-रिलिजचा ट्रेंड पहायला मिळतो आहे. जुन्या काळातले अनेक चित्रपट पुन्हा प्रदर्शित होत आहेत आणि चांगला व्यवसायही करत आहेत. बॉलिवूडमधले मोठे चित्रपट बॉक्स ऑफिसवर आपटत असताना जुन्या चित्रपटांनी मल्टीप्लेक्स मालकांना हात दिल्याचं दिसून येत आहे. ‘गँग्ज ऑफ वासेपूर’पासून ‘लैला-मजनू’पर्यंत अनेक चित्रपट पुन्हा प्रदर्शित होत आहेत. ट्रेड गुरू आणि वितरकांच्या दृष्टीने हा ट्रेंड सकारात्मक आहे. यानिमित्ताने प्रेक्षकांची पावले चित्रपटगृहांकडे वळू लागली आहेत.



हे जुने चित्रपट पुन्हा चित्रपटगृहांमध्ये पाहण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी ही सुसंधीच ठरते आहे. अशा पद्धतीने जुने चित्रपट पुन्हा प्रदर्शित करणे सर्वांसाठी लाभदायी ठरत असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. वितरकांसोबतच या चित्रपटाचे हक्क असणाऱ्यांनाही यानिमित्ताने उत्पन्नाची संधी मिळते आहे. २०१८ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘लैला मजनू’ला फारसा प्रतिसाद मिळाला नव्हता. मात्र तो नुकताच पुन्हा प्रदर्शित करण्यात आला. हा चित्रपट तरुणाईला आवडला आणि चित्रपटाने तिकिटखिडकीवर चांगली कमाई केली. ‘रॉकस्टार’च्या बाबतीतही असेच घडले. दहा, बारा, पंधरा वर्षांपूर्वी लहान असलेली आजची पिढी हे चित्रपट बघते आहे. ‘लैला मजनू’च्या खेळांच्या वेळी भारतभरात चित्रपटगृह सरासरी ४० टक्के भरलेली होती. मुंबईतल्या काही चित्रपटगृहांमध्ये तर ‘लैला मजनू’ला ८० टक्के बुकिंग मिळाले. यंदाच्या वर्षी प्रदर्शित झालेल्या ‘फायटर’, ‘बडे मियां, छोटे मियां’, ‘मैदान’, ‘सरफिरा’, ‘औरों में कहां दम था’ सारखे बिग बजेट चित्रपट फारसे चालले नाहीत. बॉलिवूडचे मोजके चित्रपट चालत असल्यामुळे जुने चित्रपट प्रदर्शित करून उत्पन्नात वाढ करण्याचा चित्रपटगृह मालकांचा प्रयत्न आहे. ‘मैंने प्यार किया’, ‘रहना है तेरे दिल में’, ‘गँग्ज ऑफ वासेपूर’सारखे चित्रपट ऑगस्ट महिन्यात पुन्हा प्रदर्शित झाले. यासोबतच ‘रॉकस्टार’, ‘जब वी मेट’, ‘ये जवानी है दिवानी’, ‘चक दे इंडिया’ आणि ‘हम आपके है कौन’सारखे चित्रपटही चित्रपटगृहांमध्ये पुन्हा प्रदर्शित करण्यात आले. पुन्हा प्रदर्शित झालेल्या चित्रपटांमुळे प्रत्येक वेळी नफा होतोच असे नाही, मात्र यानिमित्ताने प्रेक्षक चित्रपटगृहांकडे वळतात आणि हेच महत्त्वाचं असल्याचं जाणकारांचं म्हणणं आहे. त्यामुळे येत्या काळात अन्य चित्रपटही चित्रपटगृहांमध्ये पाहण्याची संधी मिळू शकते.

# जुन्यांना निरोप, नव्यांचे स्वागत

सध्या विविध मराठी वाहिन्यांवर नव्या मालिका दाखल होत आहेत. जुन्या मालिकांना निरोप देऊन प्रेक्षकांना काहीतरी नवं देण्याचा वाहिन्यांचा प्रयत्न असल्याचं दिसून येत आहे. अगदी काही महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या मालिकाही बंद करण्यात येत आहेत. मनोरंजन क्षेत्रातल्या स्पर्धेत सध्या प्रचंड वाढ झाली आहे. त्यातही टीव्हीला ओटीटीचं मोठं आव्हान आहे. टीव्हीचा प्रेक्षक वेब सिरिजकडे वळतो आहे. त्यामुळे प्रेक्षकांना सतत काहीतरी नवे देण्याचा मराठी वाहिन्यांचा प्रयत्न असल्याचं दिसून येत आहे. म्हणूनच सातत्याने नव्या मालिका वाहिन्यांवर दाखल होत आहेत. अवघ्या काही महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या मालिकाही प्रेक्षकांचा निरोप घेत आहेत. टीआरपीचा अभाव हे यामागचं महत्त्वाचं कारण मानलं जात आहे. ‘सावळ्याची जणू सावली’ या नव्या मालिकेच्या प्रोमोने सगळ्याचं लक्ष वेधून घेतलं. ही मालिका सायंकाळी सात वाजता प्रसारित होणार आहे. त्यामुळे कोणती मालिका निरोप घेणार याबाबत चर्चा सुरू आहे. ‘अप्पी आमची कलेक्टर’, ‘सारे काही तिच्यासाठी’ या मालिका ऑफ एअर होणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. ‘आई तुळजाभवानी’ या मालिकेची घोषणा करण्यात आली आहे. यासोबतच ‘उदे गं अंबे’ या मालिकाही प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. या पौराणिक मालिका प्रेक्षकांना आकर्षित करण्यात यशस्वी होणार का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. मध्यंतरी ‘दुर्गा’ ही मालिका सुरू झाली तर ‘अंतरपाट’ मालिकेने प्रेक्षकांचा निरोप घेतला. ‘अंतरपाट’ अवघ्या दोन महिन्यांमध्ये ऑफ एअर झाली. काही महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या ‘सुख कळले’ आणि ‘अबीर गुलाल’ या मालिका प्रेक्षकांचा निरोप घेणार असल्याची चर्चा आहे. कारण गुन्ह्याला माफी नाही आणि ‘निवेदिता माझी ताई’ या मालिकाही गाशा गुंडाळणार असल्याचं बोललं जात आहे. सध्या वाहिन्या कोणताही धोका पत्करायला तयार नाहीत. टीआरपीच्या यादीत येण्यासाठी महिन्या-दोन महिन्यांमध्ये मालिका बंद करून नव्या मालिका सुरू केल्या जात आहेत. सगळ्याच वाहिन्या स्पर्धेत टिकून राहण्याच्या आणि एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात असल्याचं दिसून येत आहे. मात्र यानिमित्ताने प्रेक्षकांना सतत काहीतरी नवं पहायला मिळत आहे.



# लक्षच देत नाही!



अनन्या पांडेने ओटीटीवर पदार्पण केलं आहे. तिची ‘कॉल मी बे’ ही वेब सिरिज नुकतीच सुरू झाली आहे. याबाबत अनन्याने वक्तव्य केलं आहे. प्रत्येकाच्याच आयुष्यात नकारात्मक गोष्टी घडत असतात. लोक पाठीमागून काहीबाही बोलत असतात. मात्र त्याकडे लक्ष न देता कामावर लक्ष केंद्रित करणं गरजेचं असल्याचं अनन्या सांगते. आता आपल्याला गॉसिपिंगची सवय झाली असून त्याकडे लक्ष देणं सोडल्याचं अनन्याने म्हटलं आहे. त्यामुळे अनन्या आता खऱ्या अर्थाने मॅच्युअर झाली, असे म्हणायला हरकत नाही.

# अक्षयचा ‘भूत बंगला’

अक्षयकुमारच्या ‘भूत बंगला’चा फर्स्ट लूक जारी करण्यात आला आहे. भूत बंगला हा हॉरर कॉमेडी चित्रपट असून त्यानिमित्ताने अक्षयकुमार पुन्हा एकदा यशाची अपेक्षा करतो आहे. मधल्या काळात अक्षयकुमारचे काही चित्रपट अपयशी ठरले. सध्या हॉरर कॉमेडीपटांचा बोलबाला आहे. ‘स्त्री २’ दणकून कमाई करतो आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या चित्रपटातून दणक्यात कमबॅक करण्याचा खिलाडीकुमारचा प्रयत्न असल्याचं दिसून येत आहे.



# ध्वनी अभिनय क्षेत्रात...



गायिका ध्वनी भानुशाली आता अभिनय क्षेत्रात पदार्पण करते आहे. कहां शुरू कहां खतम या चित्रपटात ती महत्त्वाची भूमिका साकारणार आहे. ध्वनी अभिनयात पदार्पण करत असली तरी तिला काही दिग्दर्शकांसोबत काम करण्याची इच्छा आहे. इम्तियाज अली, संजय लीला भन्साळी आणि सुजय घोष या दिग्दर्शकांच्या चित्रपटात काम मिळावं, असं तिला मनापासून वाटत आहे. ध्वनीची गाणी तर आपण ऐकतच असतो. मात्र आता तिचा अभिनयही पाहता येणार आहे.

# रश्मिका हॉररपटात

बॉलिवूडमध्ये सध्या हॉररपटांना चांगले दिवस आले आहेत. असे चित्रपट दणकून व्यवसाय करताना दिसत आहेत. रश्मिका मंदानाही आता अशा चित्रपटामधून प्रेक्षकांसमोर येणार आहे. ‘व्हॅमपायर्स ऑफ विजयनगर’ या चित्रपटात रश्मिका दिसणार आहे. यात आयुष्मान खुराना तिचा नायक असेल. या चित्रपटाचं दिग्दर्शन आदित्य सरपोतदार करणार आहे. या चित्रपटातून लोकांना काहीतरी वेगळं पहायला मिळू शकतं. तसंच रश्मिका आणि आयुष्मानची ऑनलाईन केमिस्ट्री बघणंही उत्सुकतेचं ठरणार आहे.



## थोडक्यात

### शिवसेना चालते, आम्हाला का दूर लोटता?

■ **छ. संभाजीनगर :** आगामी विधानसभेच्या ओवेसी यांचा एमआयएम पक्ष देखील महाविकास आघाडीमध्ये जाण्याची शक्यता आहे. याविषयी एमआयएम पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी निवडणुकीसंदर्भातील पक्षाचे धोरण मांडले आहे.



इम्तियाज जलील म्हणाले, अंबादास दानवे वेगळ्या लेवलचा माणूस आहे. आम्हाला उद्धव ठाकरेंनी सांगावे की आम्हाला सोबत घेणार आहेत की नाही. शिवसेनेसोबत जाऊ शकता. मग एमआयएमला दूर का लोटता? असा सवाल त्यांनी महाविकास आघाडीला केला आहे. पुढे ते म्हणाले, महाविकास आघाडीसोबत निवडणूक लढवण्याचा प्रस्ताव दिला आहे. त्यांनी आमच्या प्रस्तावावर विचार करावा आणि निर्णय घ्यावा, यासाठी महाविकास आघाडीला वेळ दिला असल्याचेही इम्तियाज जलील यांनी सांगितले आहे. जागा किती लढवायच्या हे आघाडीच्या गणितावर ठरवण्यात येणार आहे. आम्ही प्रस्ताव दिला आहे. त्यांच्या उत्तराची वाट पाहत आहोत. त्यांच्यासोबत गेलो तर ठीक, नाही तर ठराविक जागा लढवणार आहोत. तुम्हाला आमची ताकद बघायची असेल तर बघा. आम्ही लाचार नाही. तुम्ही नाही म्हणाले तर आम्ही घरी बसणार नाही. एक वेळा तुम्ही स्पष्ट केले तर आम्ही आमची ताकद दाखवून देऊ, असा इशारा देखील इम्तियाज जलील यांनी दिला आहे.

### कणखर दादा हतबल का?

■ **पुणे :** लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर बारामती लोकसभा मतदारसंघात अजित पवारांच्या नावाने लिहिलेले एक पत्र व्हायरल झाले होते. आता विधानसभेच्या तोंडावर पुन्हा तसेच एक पत्र बारामतीत व्हायरल झाले आहे. हे पत्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या एका कार्यकर्त्याने लिहिल्याचा दावा असून, त्यात दादांवर कुणाच्या तरी दबावाखाली भावनिक कार्ड खेळण्याचा आरोप करण्यात आला आहे. आम्ही तुमच्यासाठी पवार साहेबांना धोका दिला, पण आम्हाला काय मिळाले? असा सवालही या पत्रात अजित पवारांना विचारण्यात आला आहे.

या निनावी पत्रात अजित पवारांचा स्वभाव सध्या बदलल्याचाही दावा करण्यात आला आहे. दादा, आजकाल तुमचं वागणं, बोलणं आणि ऐकणंसुद्धा बदललं आहे. तुम्ही मन मोकळं करताय की भावनिक कार्ड खेळताय हेच समजत नाही, असे या पत्रात म्हटले आहे.


# वैनगंगा कोपली! भंडारा जिल्ह्यात पूरपरिस्थिती

■ **महासागर प्रतिनिधी**
**भंडारा, दि. ११:**

जिल्ह्यात सलग दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरु आहे. या पावसामुळे वैनगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून जिल्ह्यात पुन्हा एकदा पूरस्थिती निर्माण झाली आहे. सध्या कारधा येथे वैनगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडून दीड मीटरवरुन नदीचे पाणी वाहत आहे.

भंडारा जवळील आंभोरा येथे बायपास पुलाचे काम सुरू आहे. या ठिकाणी पोकलेन मशीनसह अन्य साहित्य मोठ्या प्रमाणावर आहे. वैनगंगेला पूर आल्याने या पुराच्या प्रवाहात सकाळी पोकलेन मशीन वाहून गेले. गोसेखुर्दच्या पात्राकडे हा प्रवाह जात असून अंभोरा येथील नवनिर्मित पुलाला धोका निर्माण झाला आहे.





पुलावर सुरू असलेल्या बांधकामादरम्यान आज सकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास पोकलेन मशीन वाहून गेले. विजेच्या हायटेन्शन लाईनच्या तारा या मशीनमुळे तुटत असल्याने परिसरातील गावांनाही धोका निर्माण झाला आहे. वीज वितरण कंपनीने हायटेन्शन लाईनचा वीजप्रवाह बंद केला आहे.

मध्य प्रदेशातील संजय सरोवरची ४, पुजरीटोला ८ आणि गोंदिया जिल्ह्यातील धापेवाडा धरणाची सर्व दारे उघडण्यात आली असून सातत्याने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. २०२० आणि २०२२ मध्ये आलेल्या महापुरासारखी स्थिती पुन्हा निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. शहराच्या काही भागात पाणी शिरले आहे . भंडाऱ्याला जोडणारा ब्रिटिशकालीन पूल वैनगंगा नदीच्या पाण्याखाली गेला आहे. पुलावरुन दीड फुटावरून पाणी वाहत आहे. त्यामुळे छोट्या वाहनांची रहदारी या बंद करण्यात आली आहे. जिल्ह्यातील अनेक रस्ते बंद करण्यात आले आहेत.

# आरक्षण संपवण्याचा काँग्रेसचा मनसुबा उघड

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११:**



काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत जाऊन काँग्रेसचा आरक्षण संपवण्याचा मनसुबा उघड केल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी केला. राहुल गांधी यांनी आरक्षण संपवण्याचे केलेले विधान अत्यंत दुर्दैवी असून, आम्ही आरक्षणाला धक्का लावण्याचा कोणताही प्रयत्न हाणून पाडू, असे ते म्हणालेत.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी सध्या अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. तिथे एका मुलाखतीत बोलताना राहुल यांनी कळीच्या आरक्षणाच्या मुद्यावर आपले मत व्यक्त केले. ते म्हणाले की, देशात सर्वांना समान संधी मिळू लागतील, तेव्हा काँग्रेस आरक्षण संपुष्टात आणण्याच्या मुद्यावर विचार करेन. पण सध्या भारतात अशी कोणतीही परिस्थिती नाही. तुम्ही आर्थिक आकडे पाहिले तेव्हा ही बाब जाणवते, असे ते म्हणाले होते.

एकनाथ शिंदे यांनी बुधवारी एका ट्विटद्वारे राहुल गांधींच्या या विधानावरून त्यांचा चांगलाच समाचार घेतला. ते म्हणाले की, विदेशात जाऊन सातत्याने भारताची येथील नागरिकांची बदनामी करण्याचा उद्योग विरोधी पक्षनेते, लोकप्रतिनिधी राहुल गांधी करतात. परदेशात जाऊन मनाला येईल ते बरळणे, बेछूट आरोप करणे लोकप्रतिनिधीला शोभत नाही. मात्र बोलताना त्यांनी काँग्रेसचा आरक्षणविरोधी खरा चेहरा उघड केला.

आरक्षण संपवण्याचा मनसुबा काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत व्यक्त केला आहे. आरक्षण संपवण्याची भाषा करणारे राहुल गांधी यांचे हे वक्तव्य अत्यंत दुदैवी आहे. शिवसेना व महायुतीतील सहकारी पक्ष आम्ही आरक्षणाच्या बाजूने आहोत आणि आरक्षण संपवू देणार नाही, याची ग्वाही पुन्हा या निमित्ताने देत आहोत. आरक्षणाला धक्का लावण्याचा कोणताही प्रयत्न आम्ही हाणून पाडू.

आपला भारत देश ही फेअर प्लेस नाही, असे परदेशात जाऊन तिथल्या विद्यार्थ्यांसमोर बोलणं हे भारतातील नागरिकांसाठी अत्यंत अवमानकारक आहे. राहुल गांधी हे परकीय मानसिकतेलाच धार्जिणे आहेत, हे या निमित्ताने सिद्ध होते. अनेक सर्वसामान्य भारतीय विद्यार्थ्यांनी जागतिक पातळीवर आपल्या बुद्धितेजाने लोकांची मने जिंकली आहेत. स्वामी विवेकानंदांपासून ते आजच्या आयटी क्षेत्रातील बुद्धिमंत विद्यार्थ्यांपर्यंत अनेकांनी अमेरिकेत भारताचा ध्वज उंचावला आहे. त्या सगळ्यांचा अवमान राहुल गांधी यांनी केला आहे. हे आम्ही कधीही सहन करणार नाही असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणालेत.

# केळझर सिध्दिविनायक मंदिरात दर्शनासाठी भाविकांची रिघ

■ **संजय धोंगडे**
**सेलू, जि. वर्धा, दि. ११:**

विदर्भाच्याअष्टविनायकांपैकी एक म्हणुन केळझरचा सिध्दीविनायक प्रसिद्ध आहे. गणेशोत्सव निमित्त येथील मंदिरात चतुर्थी पासून भाविकांची दर्शनाकरीता मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.

हे जिल्ह्यातील जागृत श्री गणेशाचे मंदिर असून विदर्भाच्या अष्टविनायकापैकी एक असल्याने विदर्भात सर्वदूर सुपरिचित आहे. केळझर नागपूरवरून ५२ किलोमीटर तर मंदिर वर्धा-नागपूर मुख्य मार्गावर अंदाजे एक फर्लांग अंतरावर उत्तरेकडे उंच टेकडीवर वसलेले आहे. मंदिराकडे जाणारा रस्ता गावातून असून रस्तादर्शक फलक मुख्य मार्गावरच लावण्यात आलेला आहे. वशिष्ठ पुराणाप्रमाणे या गावाचे नाव एकचक्रनगर असल्याचा वशिष्ठ पुराण आणि महाभारतात उल्लेख आढळतो. वशिष्ठ पुराणाप्रमाणे श्रीरामचंद्र प्रभूचे गुरू श्री वशिष्ठ ऋषी यांचे वास्तव्य असल्याची नोंद असून वशिष्ठ ऋषींनी स्वतःच्या भक्ती व पूजेकरिता या गणपतीची स्थापना केल्याचा उल्लेख आहे. त्यानंतर



त्याच काळात वर्धा नदीच्या निर्मितीचा उल्लेख आहे. पुराणाप्रमाणे या गणपतीचे नाव 'वरदविनायक' असून वर्धा नदीचे 'वरदा' असे नाव आहे. हा काळ श्रीरामजन्माच्या पूर्वीचा असून रामजन्मानंतर श्री वशिष्ठऋषींनी येथील वास्तव्य सोडले.

याच टेकडीवर श्री गणपतीचे मंदिर आहे. टेकडी निसर्गरम्य असून वाकाटकाच्या काळापासून एक भव्य किल्ल्याचे ठिकाण होते. त्या किल्ल्याला पाच बुरुज होते. तीन माती-दगडांनी बांधलेले भव्य परकोट होते. पहिल्या आणि दुसऱ्या परकोटाच्या आत चौकोनी विहीर असून त्याला 'गणेशकुंड' या नावाने ओळखले जाते. भोसलेराजे कोल्हापूरवरून नागपूरला स्थलांतरित होण्यापूर्वी त्यांचा केळझरला मुक्काम झाल्याची नोंद आहे. केळझरस्थित वरदविनायक श्री गणपतीची मूर्ती ४ फूट ६ इंच उंच असून व्यास १४ फूट आहे.

१९९४ मध्ये महाशिवरात्रीच्या अगोदर खोदकामात शिवलिंग मिळाले. याविषयी शिवलीला अमृताच्या अखेरच्या अध्यायात एकचक्रनगरात ज्योर्तिलिंग असल्याची नोंद आहे. याच गावात जैन पंथाचे आठवे तीर्थंकर चंद्रप्रभू स्वामींची सुरेख मूर्ती मिळाली. ती आठव्या शतकातील असावी.

विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने भाविक येथे दर्शनासाठी येतात. नवसाला पावणारा गणपती म्हणून या गणपतीची ओळख आहे.

गणेश उत्सवानिमित्त दहा दिवस मंदिरात रोशनाई केली असून, यावर्षी टाळ, विणा, भागवत, भजन किर्तन आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अनंत चतुर्दशीला महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला असून भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन मंदिराचे अध्यक्ष माधव ईरुटकर सचिव महादेव कापसे आणि समितीने केले आहे.

# वनवासींच्या वहिनी'




महाराष्ट्रातील पालघर जिल्हयातील सामाजिक क्षेत्रात गोदूताई परुळेकर, अनुताई वाघ आणि सुनंदाताई पटवर्धन या तीन कर्तबगार महिलांनी महत्वपूर्ण योगदान दिलेलं आहे. गोदुताईनी वनवासी बांधवांवर होणाऱ्या शोषणाविरुद्ध आवाज उठवला, तर अनुताई आणि सुनंदाताईंनी वनवासी बांधवाना तिमिरातून तेजाकडे नेले. या तीन विभूतीतील समान दुवा म्हणजे वनवासी बांधवानी या तिघीना 'ताई 'हे टोपणनाव दिले. गोदुताईंचे कार्य बऱ्यापैकी लोकांसमोर आले आहे, पण त्या तुलनेत उत्कृष्ट दर्जाचे सेवाकार्य असूनही अनुताई आणि सुनंदाताईंच्या कामाची नोंद घेतली गेली नाही

सुनंदाताईंच्या सेवाकार्याचे पैलू जयश्री कुलकर्णी यांनी आपल्या 'वनवासींच्या वहिनी' या चरित्रात्मक पुस्तकातून प्रथमच लोकांसमोर आणले आहे.

वाईतील एका सुखवस्तू परिवारातील शशिकला घोटवडेकरचा (सुनंदा पटवर्धन) विवाह ठाण्यातील अप्पा उपाख्य वसंतराव पटवर्धन या ध्येयवेड्या स्वयंसेवकाशी होतो. वसंतरावांनी ठाण्यातीलच जव्हार, मोखाडा, विक्रमगड या भागात प्रवास करून वनवासींच्या वेदना समजून घेतल्या. वनवासींच्या उत्थानासाठी 'प्रगती प्रतिष्ठानची' उभारणी केली या प्रकल्पकार्याच्या सुनंदाताई सहप्रवासी ठरल्या. घरची जवाबदारी समर्थपणे सांभाळत सुनंदाताईंनी वनवासी बांधवांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविले .स्वावलंबन, आरोग्य, शिक्षण ,व्यसनमुक्ती, शेती आणि ग्रामविकासात भरीव योगदान देत त्यांनी वनवासी बांधवांचा विकास घडवून आणला. हे सारे चित्रण प्रस्तुत 'वनवासींच्या वहिनी 'या पुस्तकात शब्दबद्ध झाले आहे.

१११ पृष्ठाच्या या पुस्तकात सुनंदाताईंचे वाईतील दिवस, वसंतराव पटवर्धन आणि कुटुंबीयांसमवेतचे जीवन आणि प्रगती प्रतिष्ठानचा व्यतीत केलेल्या कार्यावर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे.

पाच दशके वनवासी बांधवांत राहून त्यांनी आपल्या सामाजिक कार्याचा आलेख चढता ठेवला. प्रस्तुत पुस्तकातून सेवाभावी वृत्तीचे दर्शन घडते म्हणूनच हे पुस्तक प्रत्येकाने आवर्जून वाचावे असेच आहे. ■

### लोकजागर

**शब्दार्थ OTP**

OTP म्हणजे वन टाईम पासवर्ड. ओटीपी हा एक सुरक्षा कोड आहे, जो ऑनलाइन व्यवहारांसाठी वापरला जातो. ऑनलाईन बँकेचा व्यवहार असो किंवा ऑनलाईन डेबिट किंवा क्रेडीट कार्डाने देय देणे असो, ओटीपी ने व्हेरिफाय करणं महत्वाचं असतं. ओटीपी हे 4 ते 8 अंकी एक सुरक्षा कोड असतो. जे व्हेरिफाय करण्यासाठी आपल्या मोबाईलनंबर वर मॅसेज रूपात येतं. ओटीपी ला आपण एक रीृ४१३८ ढंर२६ङ्गर्१ देखील म्हणू शकतो, हे नेहमी रिक्वेस्ट केल्यावर आपोआप तयार होतं. हे प्रत्येक वेळी वेगवेगळं असतं. याचा अर्थ असा आहे की ओटीपी हा एक युनिक कोड आहे. ■

# गणेशाच्या प्रसादरूपातून उभे राहिले आयुष्य

आई धुणीभांडी करते, वडील मंडईत भाजी विक्रेत्याचा व्यवसाय करतात. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे महाविद्यालयाचे शुल्क भरणे कठीण होते. पण, गणेश मंडळाने माझे वर्षभराचे शैक्षणिक शुल्क भरले.



आज मी स्वतःच्या पायावर उभा राहून उच्च शिक्षण घेत आहे "पुण्यातील पर्वती पायथ्याशी राहणारा राजेश चव्हाण सांगत होता.

बुद्धीची देवता असणाऱ्या गणपतीच्या उत्सवात गणेश मंडळाचे कार्यक्रम, ध्वनिवर्धक, विसर्जन, मिरवणुकीमुळे होणार त्रास याबद्दल बरीच चर्चा होत असते . परंतु हीच गणेश मंडळे वर्षभर अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवत असतात याबाबद्दल मात्र फारस बोललं जात नाही. ही मंडळ लोकवर्गणी किंवा भाविकांकडून मोठ्या श्रद्धेने मिळालेल्या दानातून समाज घडविण्याचे काम करतात. लोकमान्य टिळकांना अपेक्षित असणारी समाजबांधणी आणि गरजूना उभे करण्याचे काम हि मंडळ सातत्याने करतात.

पुण्यात सुमारे चार हजार गणपती मंडळ आहेत, यातील प्रत्येक मंडळ दानरूपातून आलेल्या वर्गणीतून आपापल्या परीने सामाजिक, धार्मिक उपक्रम हाती घेत असतात. पुण्यातील गणेशोत्सवाचे खास आकर्षण असणाऱ्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळ गणेशोत्सव काळात भव्यदिव्य देखावे उभारतात.

मात्र त्याचवेळी अनेक चांगले सामाजिक उपक्रम देखील राबवतात. वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांची मुले, वीटभट्टी कामगार यांच्या मुलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण आणि निवासाची सोय या मंडळाने केली आहे. पुण्यातल्या ससून रुग्णालयात राज्यातल्या कानाकोपऱ्यातून गरीब रुग्ण उपचारासाठी येत असतात.

बाराशे खतांच्या या रुग्णालयातील रुग्णांना उत्तम आणि पौष्टिक जेवण मिळावे यासाठी दगडूशेठ गणपती मंडळाने रुग्णालयामधल्या स्वयंपाकघराचे दोन कोटी रुपये देणगी देऊन आधुनिकीकरण केले आहे. दररोज सकाळ संध्याकाळ बाराशे रुग्णांना डॉक्तरांच्या सल्ल्याप्रमाणे जेवण दिले जाते. यासाठी वर्षाचा १६ कोटी रुपयांचा खर्च मंडळ करते. शिवाय विघ्नहर्ता न्यासाच्या माध्यमातून शहरातील प्रमुख ५० ते ५५ मंडळांच्या वतीने आपत्ती काळात तात्काळ मदत पोहचवली जाते. दुष्काळ, पूर, माळीण दुर्घटना अशा प्रसंगी तातडीची वैद्यकीय मदत, अन्नधान्याचे किट, निवाऱ्यासाठी मदत न्यासाने केली आहे.

यासाठी दरवर्षी दानरूपातून येणारा निधी बाजूला ठेवला जातो. याशिवाय, गरीब शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तक आणि दप्तर वाटप, विद्यार्थी आणि महिलांसाठी योग शिबीर, पूरग्रस्त भागातील नागरिकांसाठी मदत, गरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क अदा करणे असे अनेक विधायक उपक्रम मंडळाने कायम राबविले आहेत आणि यशस्वी देखील केलेले आहेत. एकूणच, अशा गणेश मंडळाच्या विधायक आणि समाजहितोपयोगी कार्यातूनच खऱ्या अर्थाने श्रीगणेश देखील प्रसन्न होतो असं निश्चित म्हणता येते. ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com



नागपूर

# महासागर वृत्तसागर

■ गुरुवार, दि. १२, सप्टेंबर २०२४ ■

# प्रेयसीचा खून करून पुरला रामटेकच्या जंगलात मृतदेह

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

लग्नाचा तगादा लावणाऱ्या प्रेयसीचा प्रियकारने खून करून तिचा मृतदेह जंगलात पुरला. ही घटना मंगळवारी उघडकीस आली असून मानकापूर पोलिसांनी आरोपी प्रियकराला अटक केली. त्याने खून केल्याची कबुली दिली असून बुधवारी पुरलेला मृतदेह काढण्यात येणार आहे. महेश केशव वळसकर (५७, रा. न्यू सोमवारीपेठ, सक्करदरा) असे आरोपी प्रियकराचे, तर प्रिया बागडी ऊर्फ प्रिया गुलक (२४) असे खून झालेल्या तरुणीचे नाव आहे.



प्रिया गेल्या सहा वर्षांपासून फरस, गोधनी येथे कुटुंबापासून वेगळी राहत होती. ती गेल्या १६ तारखेपासून अचानक बेपत्ता झाली. तिचा मोबाईल बंद येत असल्यामुळे तिच्या आईने खोलीवर जाऊन बघितले. घराला कुलूप दिसल्याने तिने शेजाऱ्यांकडे चौकशी केली. ती आठवडाभरापासून घरी नसल्याची माहिती मिळाली. त्यामुळे आईने मानकापूर पोलीस ठाण्यात मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली.

पोलीस उपायुक्त राहुल मदने यांनी प्रियाचे लोकेशन घेऊन तपास करण्यास सांगितले. तिचे शेवटचे लोकेशन रामटेकमधील एका हॉटेलमध्ये मिळून आले. ते हॉटेल आरोपी महेश केशव वळसकर यांच्या मालकीचे होते. महेशसोबत गेल्या आठ वर्षांपासून तिचे प्रेमसंबंध होते. ती नेहमी महेशच्या हॉटेलमध्ये मुक्कामी राहत होती. तिचा संपूर्ण खर्च महेशच करीत होता. गेल्या महिनाभरापासून प्रिया लग्नासाठी महेशमागे तगादा लावत होती. मात्र, विवाहीत असलेला महेश लग्न करण्यास तयार नव्हता.

महेशची दूधाची भूकटी तयार करण्याची कंपनी होती. त्या कंपनीत प्रिया नोकरीवर होती. तेव्हापासून दोघांची ओळख झाली. कंपनीतच दोघांचे प्रेमसंबंध जुळले ते आतापर्यंत कायम होते. गेल्या तीन दिवसांपूर्वी प्रिया ही महेशसोबत हॉटेलवर गेली. तिने लग्नासाठी महेशवर दबाव टाकला. त्यामुळे त्याच रात्री महेशने तिचा गळा आवळून खून केला. तिला हॉटेलपासून तीन किमी अंतरावर जंगलात पुरले.

## प्रियकरासह त्या महिलेचा विष प्राशन करण्याचा प्रयत्न

प्रियाच्या आईने महेशवर संशय व्यक्त केल्यामुळे त्याला मानकापूर पोलिसांनी चौकशीसाठी ठाण्यात आणले. यामुळे तो घाबरला आणि त्याने विष प्राशन करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याच्या हॉटेलमध्ये काम करणाऱ्या एका महिलेची चौकशी केली असता तिनेही विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांना वेगळाच संशय आल्याने महेशला पुन्हा ताब्यात घेण्यात आले. त्याला पोलिसीखाक्या दाखवताच प्रियाचा खून केल्याची कबुली त्याने दिली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून महेशला अटक केली.

# एसटी व पिकअप वाहनाच्या अपघातात १ ठार, २० जखमी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

समोरून भरधाव आलेले पिकअप वाहन अचानक प्रवासी घेऊन नागपूरकडे येत असलेल्या एसटी बससमोर येऊन उलटले. यामुळे गोंधळलेल्या एसटी बसच्या चालकाने रस्त्यावर उभ्या दुसऱ्या एका नादुरुस्त बसला मागून जोरदार धडक दिली. यात पिकअप वाहनाच्या चालकाचा जागीच मृत्यू झाला, तर बसमधील 20 प्रवासी गंभीर जखमी झाले.



सातगाव फाट्याजवळील घटना

अपघाताची ही विचित्र घटना बुटीबोरी ठाण्यांतर्गत सातगाव फाट्यावर मंगळवारी सायंकाळी 5.30 वाजताच्या सुमारास घडली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मृतक आणि जखमींची नावे रात्री उशिरापर्यंत कळू शकली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, राळेगाव आगाराची एमएच-40/वाय-5475 क्रमांकाची राळेगाव-नागपूर एसटी बसचा चालक नंदकिशोर लोखंडे हा प्रवासी घेऊन नागपूरकडे येत होता. बसमध्ये चालक-वाहकासह 34 प्रवासी होते.

त्याच दरम्यान पिकअप वाहन क्र. एमएच-40/सीएम-2306 चा चालक भरधाव वेगात बुटीबोरीकडे जात होता.

सातगाव परिसरात दोन्ही वाहन अचानक एकमेकांसमोर आल्याने पिकअप वाहनाच्या चालकाचे नियंत्रण सुटले. पिकअप वाहन दुभाजकावर धडकत अगदी बससमोर येऊन उलटले. अचानक घडलेल्या या घटनेमुळे बसचालक नंदकिशोर हे सुद्धा गोंधळले. त्यांचे बसवरून नियंत्रण सुटले. अनियंत्रित बसने जवळच उभ्या असलेल्या उमरेड आगाराच्या नादुरुस्त एसटी बस क्र. एमएच-40/वाय-5087 ला मागून जबर धडक दिली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. आसपासचे लोक मदतीसाठी धावले. पिकअप वाहनाच्या चालकाचा जागीच मृत्यू झाला होता, तर राळेगाव आगाराच्या बसचे चालक-वाहकासह 20 प्रवासी जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच बुटीबोरी घटनास्थळी पोहोचले. सर्व जखमींना उपचारार्थ रुग्णालयात रवाना करण्यात आले. तर मृताला उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात रवाना करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच विभाग नियंत्रक राप नागपूर, विभागीय वाहतूक अधिकारी राप नागपूर, आगार व्यवस्थापक गणेशपेठ नागपूर आदी अधिकाऱ्यांनी घटनास्थळ गाठून घटनेचा आढावा घेतला.

# नराधमांना 20 वर्षांचा कारावास

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

राहणाऱ्या 12 वर्षीय बालकाचे लैंगिक शोषण करणाऱ्या दोन आरोपींना पोक्सोच्या विशेष न्यायालयाचे न्यायाधीश आर. पी. पांडे यांनी दोषी ठरवून 20 वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली. बादल उर्फ चिंटू जगदीश जीवतोडे (20) आणि रवीकुमार फुलचंद चवरे (34) दोन्ही रा. वाडी, अशी दोषींची नावे आहेत. वाडी पोलिसांनी 16 नोव्हेंबर 2020 रोजी पीडित बालकाच्या आजीने दिलेल्या तक्रारीवरून दोन्ही आरोपींवर विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला होता.

दोन्ही आरोपी मुलाला धमकावून निर्जनस्थळी घेऊन जात होते आणि तेथे त्याच्याशी अनैसर्गिक कृत्य करीत होते. त्यामुळे पीडित बालक घाबरलेला होता. तो नेहमी भेदारलेल्या अवस्थेत रहात होता. आजीला त्याची अवस्था पाहून संशय आला. तिने विश्वासात घेऊन विचारपूस केली असता आरोपी गत एक महिन्यापासून त्याचे शोषण करीत असल्याचे समोर आले. आजीने पीडितला वाडी पोलिस ठाण्यात घेऊन जात तक्रार दाखल केली. पोलिसांनी पोक्सो अॅक्टच्या कलम 4 (2), भादंविच्या कलम 377 सह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून दोन्ही आरोपींना अटक केली.

तत्कालीन पोउपनि गोबाडे यांनी प्रकरणाचा तपास करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. सरकारी वकील आसावरी परसोडकर आणि कल्पना पांडे आरोप सिद्ध करण्यात यशस्वी झाल्या. न्यायालयाने पोक्सोच्या प्रकरणात आरोपींना 20 वर्षे आणि अनैसर्गिक कृत्य केल्याप्रकरणी 10 वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. सोबतच दोघांनाही प्रति 15 हजार रुपये दंडही सुनावला. दंड भरला नाहीतर अतिरिक्त शिक्षा भोगावी लागेल. पैरवी अधिकारी म्हणून पोहवा अनिल पोतराजे यांनी अभियोजन पक्षाला सहकार्य केले.

# गुंडाच्या घरी गुन्हे शाखेची धाड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने गुप्त माहितीवरून एका गुंडाच्या घरी धाड टाकली. झडतीमध्ये पोलिसांनी त्याच्या घरातून एक पिस्तूल आणि दोन काडतूस जप्त केले. शीलवंत उर्फ शील भगवान सोनटक्के (37) रा. पडोळेनगर, असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

नंदनवनच्या पडोळेनगरात राहणारा गुंड शील याच्याकडे पिस्तूल असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर मंगळवारी सायंकाळी पोलिसांनी त्याच्या घरी धाड टाकली. घराच्या झडतीत पोलिसांना एक पिस्तूल आणि मॅग्झिनसह दोन काडतूस मिळाले. पोलिसांनी शस्त्र जप्त करून शील याला अटक केली. त्याच्याविरुद्ध नंदनवन ठाण्यात आर्म्स अॅक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. शील हा सराईत गुन्हेगार आहे. जवळपास 14 वर्षांपासून तो गुन्हेगारीत सक्रीय आहे. त्याच्याविरुद्ध खून, खुनाचा प्रयत्न, मारहाण आणि आर्म्स अॅक्ट अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. त्याची लगाम कसण्यासाठी जानेवारी 2022 मध्ये झोन 4 चे तत्कालीन डीसीपी नुरुल हसन यांनी एक वर्षासाठी त्याला नागपूर जिल्ह्यातून तडीपार केले होते. तडीपारीचा कालावधी पूर्ण होताच शील पुन्हा गुन्हेगारीत सक्रीय झाला. पोलिसांना त्याच्याकडे पिस्तूल असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती.

# १,७३१ वाहन चालकांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 1,731 वाहन चालकांवर कारवाई करून 3,11,600 रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारू बंदी कायद्यान्वये दोन प्रकरणात 2 आरोपींवर कारवाई करून 2555 रुपयांचा तर जुगार कायद्यान्वये एक प्रकरणात 3 आरोपींवर कारवाई करून 25,640 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली.

# आता डॉक्टरांना कौशल्य विकासासाठी डीएचएफसी सक्ती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकने राज्यातील डॉक्टरांच्या कौशल्य विकासासाठी डिजिटल हेल्थ फाऊंडेशन अभ्यासक्रम (डीएचएफसी) सुरू केला आहे. आंतरवासिता विद्यार्थ्यांसाठी तो सक्तीचा असून कालांतराने परिचारिका, आयुषच्या विद्यार्थ्यांनाही सक्तीचा केला जाणार आहे.



विद्यापीठाच्या कुलगुरू लेफ्टनंट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) यांच्या संकल्पनेतून या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली असून तो ऑनलाईन स्वरूपात निःशुल्क उपलब्ध आहे. रोज दोन तासांचा वेळ दिला तर हा अभ्यासक्रम सुमारे आठ ते दहा दिवसांमध्ये पूर्ण होऊ शकेल. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर संबंधित विद्यार्थ्यांला एक ऑनलाईन परीक्षाही देणे बंधनकारक आहे. त्यात उत्तीर्ण झाल्यास आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून संबंधित डॉक्टरांना दोन क्रेडिट पॉईंट मिळतील. त्यासाठी आरोग्य विद्यापीठ महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (एमएमसी) आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (एनएमसी)ला पत्र देईल. त्यामुळे कुणालाही अभ्यासक्रम पूर्ण केल्याचा देखावा करता येणार नाही, अशी माहिती कुलगुरू माधुरी कानिटकर यांनी दिली.

विद्यापीठाच्या डीएचएफसी अभ्यासक्रमात १३ प्रकारचे विभाग आहेत. त्यात नवजात शिशू, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि इतरही विविध विषयांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमात डॉक्टरांना संबंधित विषयाच्या ज्ञानासह केंद्र व राज्य सरकारच्या आरोग्य योजनांची माहिती, रुग्णाचा डेटा कसा संग्रहित करावा, संशोधनात्मक वापर याबाबतही शिक्षण दिले जाईल.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ हे महाराष्ट्रातील आरोग्यविज्ञान व वैद्यकीविषयक विद्यापीठ आहे. याचे मुख्यालय नाशिक येथे आहे. महाराष्ट्र शासनाच्या विशेष अधिकारानुसार ह्यमहाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नियम, १९९८ह्यला अनुसरून हे इ.स. १९९८ साली स्थापन झाले. अभिमत विद्यापीठ वगळून राज्यामध्ये येणारी सर्व वैद्यकीय, आयुर्वेद, दंत, युनानी, होमिओपॅथी, परिचर्या महाविद्यालय, व्यवसायोपचार व भौतिकोपचार महाविद्यालये, बीपीएमटीसह निमवैद्यकीय अभ्यासक्रम या विद्यापीठाच्या अखत्यारीत येतात. सध्या या विद्यापीठाचे कुलगुरू लेफ्टनंट जनरल (निवृत्त) डॉ. माधुरी कानिटकर आहे. विद्यापीठाचा कारभार चालण्यासाठी ११ विविध समित्या व विभागांची स्थापना करण्यात आली आहे.

# पोलीसच करायचा सट्टयाची लगवाडी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

ज्याच्यावर कायदा सुव्यवस्था राखण्याची आणि अवैध धंद्यांची लगाम कसण्याची जबाबदारी होती तो स्वतः सट्टा लावत होता. इतकेच नाहीतर तो आर्थिक देवाण-घेवाणीतून पोलिसांच्या हालचालींची माहितीही सट्टेबाजाला देत होता. पोलिसांची प्रतिमा दागाळणारी ही धक्कादायक माहिती झोन 4 च्या डीसीपी रश्मिता राव यांच्या विशेष पथकाने गुप्त माहितीवरून एका सट्टेबाजावर केलेल्या कारवाईदरम्यान समोर आली आहे. मनोहर काशीनाथ मुलमुले (42) असे आरोपी शिपायाचे नाव आहे. तो अजनी पोलिस ठाण्यात शिपाई पदावर कार्यरत आहे. पोलिसांनी या प्रकरणात सट्टेबाज मंगेश बावणे (40) रा. बेलतरोडी आणि मनीष प्रजापती (26) रा. हुडकेश्वर या दोघांना अटक केली आहे. विशेष म्हणजे या कारवाईचीही माहिती मनोहरने मोबाईल फोनद्वारे मंगेशला दिली होती. पोलिसांनी मनोहर यालाही या प्रकरणात आरोपी करून त्याच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरू केली आहे. लवकरच त्याला निलंबित केले जाऊ शकते. या कारवाईने पोलिस विभागात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पार्वतीनगरातील श्रीकृष्ण डेअरी व जनरल स्टोअरच्या आड बावणे आणि प्रजापती हे दोघेही अनेक वर्षांपासून सट्टा अड्डा चालवत असल्याची माहिती झोन 4 च्या नवनियुक्त डीसीपी राव यांना मिळाली होती. त्यांनी अजनीचे ठाणेदार नितीनचंद्र राजकुमार यांना तेथे धाड टाकण्याचे निर्देश दिले. तत्काळ एक विशेष पथक तयार करून बावणेच्या अड्डयावर धाड टाकण्यात आली. पथकाचे नेतृत्व स्वतः डीसीपी राव यांनी केले होते. पोलिसांना पाहताच लगवाडीसाठी आलेल्यांमध्ये पळापळ सुरू झाली. बावणे आणि प्रजापती पोलिसांच्या हाती लागले. झडतीमध्ये त्यांच्यातजवळून रोकड, सट्ट्याचे आकडे लिहिलेल्या 251 चिठ्ठ्या व मोबाईलसह 25,640 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### अनेकदा झाले होते ऑनलाईन ट्रांजेक्शन

पोलिसांनी बावणेचा मोबाईल तपासला असता त्यातून अनेक धक्कादायक खुलासे झाले. अजनी ठाण्याचा पोलिस शिपाई मनोहर हा आरोपींच्या सतत संपर्कात होता. आरोपी आणि मनोहर यांच्यात अनेकदा ऑन लाईन ट्रांजेक्शन झाल्याचेही समजले. आरोपीने मनोहरला आणि मनोहरने आरोपीला रक्कम पाठविली असून लगवाडीच्या नोंदी सुद्धा आढळल्या. विशेष म्हणजे धाड पडली त्याच वेळी मनोहरने फोन करून बावणेशी संपर्क साधला होता. या प्रकरणी पोलिस उपायुक्त यांच्या आदेशाने पोलिस शिपायासह तिघांवरही गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलिस उपायुक्त राव यांच्या मार्गदर्शनात वपोनि नितीनचंद्र राजकुमार, उपनिरीक्षक सुशांत उपाध्ये, अंमलदार चेतन एडके यांनी केली.

पुढील कारवाईच्या दृष्टीने खायवाडी करणाऱ्यांकडे धाड टाकल्यानंतर आरोपींचा मोबाईल तपासला जातो. या प्रकरणातही आरोपीचा मोबाईल तपासल्यानंतर अजनी ठाण्याचा पोलिस शिपाई त्यांच्या संपर्कात असल्याचे स्पष्ट झाले. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात विभागीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल. परिमंडळांतर्गत कुठल्याही प्रकारचे अवैध धंदे चालू देणार नाही. अजनीचे ठाणेदार नितीनचंद्र राजकुमार यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, ठाण्यांतर्गत कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे किंवा हालचाली सुरू असतील तर त्यांच्या 9423278620 या मोबाईल क्रमांकावर माहिती द्यावी.

# संकेत बावनकुळेलाही निबंध लिहायला लावून सोडणार का?

## सुषमा अंधारे यांचा सवाल



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

नागपुरातील ऑडी कार अपघात प्रकरणी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत बावनकुळे यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अन्यथा कायदेशीर लढाई लढावी लागेल, असा इशारा शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी नागपूर पोलिसांना दिला.

सुषमा अंधारे यांनी बुधवारी बर्डी पोलिस ठाण्यात जावून पोलिस निरीक्षक चंद्रशेखर चकारे, पोलिस उपायुक्त राहुल मदने यांची भेट घेत ऑडी अपघाताचा घटनाक्रम समजावून घेतला. त्या नंतर माध्यमांशी बोलताना अंधारे यांनी पोलिसांवर प्रकरण दडपत असल्याचा आरोप केला. पुण्यातील पोर्शेकार अपघाता प्रमाणे संकेत बावनकुळेलाही निबंध लिहायला लावून सोडून देणार का? असा सवाल अंधारे यांनी केला आहे.

संकेत बावनकुळे लाहोरी बारमध्ये मसाला दूध पिण्यास गेला होता का, असा सवाल त्यांनी केला. त्यानंतर सुषमा अंधारे यांनी पोलिस तपासातील उणीवा दाखवत नागपूर पोलिस बावनकुळे व गृहमंत्र्याच्या दबावाखाली तपास करीत असल्याचा आरोप केला. पत्रकारांशी संवाद साधताना अंधारे यांनी पोलिस खात्याची चांगलीच झाडाझडती घेतली.

या घटनेच्या संदर्भात अंधारे यांनी पोलिसांना या घटनेबाबत काही प्रश्न देखील विचारले आहे. एखादा अपघात घडतो किंवा अशी काही घटना होते, तेव्हा गाडी पोलिस ठाण्यात नेली जाते. मात्र बावनकुळेंच्या मुलाची गाडी गॅरेजमध्ये दुरूस्ती करण्यासाठी का देण्यात आली, असा प्रश्न अंधारेंनी पोलिसांना विचारला.

अपघातातील गाडीचा नंबर एफआयआरमध्ये का नाही? अपघातग्रस्त गाडी गॅरेजमध्ये का पाठवली? संकेत बावनकुळेची मेडिकल का केली नाही? असे अनेक सवाल नागपूर पोलिसांना केले आहे. त्यावर पोलिस थंड डोक्याने पाठ केलेली एकच माहिती सांगत राहिले.

# ताजराज गणेशोत्सव मंडळाची १०२ वर्षांची परंपरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

एका हातात चक्र व एका हातात खंजीर, गुलाबी वस्त्र व पिवळे पितांबर नेसलेला, मुकुटावर शंकराची मूर्ती विराजमान असलेल्या आकर्षक 13 फूट उंचीच्या अत्यंत लक्षवेधक गणेश मूर्तीची मांडणी करून रोज सकाळ संध्याकाळ आरत्या व पूजा पाठाद्वारे बुद्धीची देवता गणरायाला जनतेच्या सुख-समृद्धीसाठी व उत्तम आरोग्यासाठी ताजबाग, राजे रघुजी नगर, नागपूर येथील ताजराज गणेशोत्सव मंडळाद्वारे साकडे घालण्यात येत आहे.

अत्यंत साधेपणात, सात्विकतेने कोणत्याही दिखावेबाजीला बळी न पडता आकर्षक मूर्ती मांडण्याची व लोकहितार्थ मनोकामना मागण्याची आपली पिढ्यानपिढ्याची परंपरा जपत हे मंडळ यंदा आपले 102 वे वर्ष साजरे करत आहे.

या मंडळाचे वैशिष्ट्य म्हणजे कोणतीही वर्गणी न काढता मंडळाचे सदस्य व व्यापारी संकुलातील व्यापारी वर्ग स्वेच्छेने गणेशोत्सवासाठी लागणारा निधी जमा करतात व दहा दिवस मोठ्या भक्ती भावाने गणेशोत्सव साजरा केला जातो.



ताजराज गणेशोत्सव मंडळाद्वारे यंदा अंदाजे चार लाख रुपये खर्चून चित्त वेधक अशा लाल पिवळ्या रंगाच्या कापडाने तयार केलेल्या मंडपात पूर्णपणे मातीची असणारी पर्यावरण पूरक अशी गणरायाची मूर्ती छोटा ताजबाग, राजे रघुजी नगर येथे स्थापित करण्यात आली आहे.

रघुजी राजे भोसले यांच्या काळापासून तर ताजुद्दीन बाबा हयात होते तेव्हापासून सुरुवातीला गणेश मूर्तीची स्थापना ही ताजुद्दीन बाबाच्या दरबारात होत असे. त्यावेळी लोककथा व देश कथा सांगणाऱ्या हलत्या मुर्त्यांच्या स्टेज शो होत असे, जो बघण्याकरिता प्रचंड गर्दी जमत असे.

सकाळ संध्याकाळ पूजापाठ व आरती करून आजच्या मोबाईल मध्ये व्यस्त असणाऱ्या तरुणांना व परिसरातील भाविकांना एकत्रित आणून जनतेच्या सुख-समृद्धीसाठी व उत्तम आरोग्यासाठी आराधना करण्याचे सत्कार्य या मंडळाकडून होत आहे. लहानांपासून तर थोरांपर्यंत जवळपास 50 सदस्य असलेल्या या मंडळाचे कार्य केवळ गणेशोत्सवापूर्ती मर्यादित न राहता,

या मंडळातील सदस्य आपले सामाजिक बांधिलकीचे दायित्व वर्षभर जपत जनतेच्या हितार्थ धावून जात असतात. गणेशोत्सवासाठी मूर्ती स्थापनेपासून तर शेवटच्या दिवशी चे भोजन व मिरवणुकी पर्यंत चा सर्व कारभार मंडळाचे अध्यक्ष, माजी नगरसेवक संजय महाकाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली चालतो. तसेच सदस्य मंडळातील ज्येष्ठ कार्यकर्ते किशोर देशकर यांच्या समन्वयातून, पराग खानविलकर, उमेश राऊत, राजेश कडू, रोशन दुधाने, रोहित तायवाडे यांच्या सोबतच इतर सदस्यांच्या सहयोगातून या गणेशोत्सवाचा सामाजिक उपक्रम यशस्वीरित्या राबविल्या जात आहे.

# वृक्षारोपण संवर्धनाशिवाय पर्याय नाही : डॉ.विजय देशमुख



## नगर परिषद व जवाहरलाल नेहरु कॉलेजचा उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ११ :

येथील जवाहरलाल नेहरु महाविद्यालय व वाडी नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत माझी वसुंधरा ०.५ अभियान राबवून वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी पर्यावरण समतोल व वसुंधरेसह भविष्यातील मानवी जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी वृक्षारोपणासह त्याचे संवर्धन करण्याशिवाय आपल्याकडे दुसरा पर्यायच नसल्याचे प्रतिपादन मुख्याधिकारी डॉ.विजय देशमुख यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हीएसपीएमचे सचिव युवराज चालखोर तर प्रमुख पाहुणे म्हणून वाडी नगर परिषदचे मुख्याधिकारी डॉ.विजय देशमुख,प्राचार्य डॉ.संजय टेकाडे, ग्रीन नेचर क्लब चे समन्वयक डॉ. अविनाश इंगोले, एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी डॉ.काशीनाथ मानमोडे, डॉ.नरेंद्र घारड,मुख्याध्यापक सचिन डेहनकर प्रामुख्याने उपस्थित होते. सर्व प्रथम संस्थेचे सचिव युवराज चालखोर यांच्या हस्ते मुख्याधिकारी डॉ.विजय देशमुख यांचे शाल,श्रीफळ व पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पर्यावरण सुरक्षेसाठी वृक्षारोपण व संवर्धनाचे महत्व पटवून देतांना भविष्यातील येणाऱ्या पिढीचे जीवन सुखद करण्यासाठी आपल्याकडे वृक्षारोपण व संवर्धन करण्याशिवाय दुसरा पर्याय नसल्याने सांगितले.अध्यक्ष युवराज चालखोर यांनी लावलेल्या झाडांचे जतन करण्याची जबाबदारी महाविद्यालय घेणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन डॉ.काशिनाथ मानमोडे यांनी तर आभार अविनाश इंगोले यांनी मानले. वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी वाडी नप.चे स्वच्छता ब्रॅण्ड एम्बेसिडर नरेशकुमार चव्हाण,स्वच्छता निरीक्षक मुकेश महातो,हर्ष कापसे,शहर समन्वक आशिष गुंडूकवार, राधेश्याम गिऱ्हे,सतीश जंगले, गोदरेज फिड बॅक फौंडेशनचे आदर्श तवर उपस्थित होते.

# शहरातील प्रमुख मार्गाने घेतला अनेकांचा बळी

## सामाजिक कार्यकर्ता रजनिश मेश्राम यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ११ :

कन्हान शहरातील प्रमुख रस्त्यावर अनेक वर्षा पासुन गतिरोधक नाही आहे. या रस्त्यावर अनेक छोटे मोठे अपघात झाले असुन कित्येक नागरिकांचा बळी गेला असुन अनेक नागरिक अपंगत्व झाले.

तरी देखील या कडे पीडब्ल्यूडी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष करीत असल्याने सामाजिक कार्यकर्ता रजनिश मेश्राम यांनी जिल्हाधिकाऱ्यांना आणि जन प्रतिनिधिंना निवेदन देऊन जुने कन्हान पोलीस स्टेशन ते धन्यवाद गेट पर्यंत गतिरोधक बनविण्याची मागणी केली आहे.

शहरातील प्रमुख रस्त्यावर २४ तास एक ही सेंकद न थांबता वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात सुरु असते. या रस्त्यावर जुने पोलीस स्टेशन ते धन्यवाद गेट पर्यंत जवळपास दोन किलोमीटरचा अंतर असुन महामार्गच्या दोन्ही बाजुला व्यवसाईक वसाहत, धर्मराज शाळा, सरस्वती न्यू इंग्लिश शाळा, श्री नारायणा विद्यालय व जुनियर कॉलेज , बिकेसीपी शाळा, इंदिरा गांधी कनिष्ठ महाविद्यालय, दररोजची गुजरी बाजार, साप्ताहिक बाजार, धार्मिक स्थळे, शासकीय कार्यालय, युनियन बैंक, सेंट्रल बैंक, स्टेट बैंक ऑफ इंडिया, पंजाब नेशनल बैंक , निर्मल बैंक, संयोग बैंक, महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनी तक्रार कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंन्द्र, कन्हान-पिपरी नगरपरिषद कार्यालय, पशु चिकित्सालय, कन्हान पोलीस स्टेशन विभाग कार्यालय असुन हजारो लोक रोज ये जा करीत असतात.

या दोन किलो मीटरचा अंतरावर कुठल्याही ठिकाणी गतिरोध नसल्याने वाहन चालक आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित असल्याने कित्येक नागरिकांचा मृत्यु झाला, तर अनेक नागरिक अपंगत्व होऊन कष्टमय जीवन जगत आहे.

शहरातील प्रमुख रस्त्यावर आज ही छोटे मोठे अपघात होत असुन शासन प्रशासन, महामार्गचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने सामाजिक कार्यकर्ता रजनीश मेश्राम यांनी जिलाधिकारी, कार्यकारी अभियंता सा.बा विभाग कार्यालय नागपुर, कन्हान - पिपरी नगरपरिषद मुख्याधिकारी, खारसदार श्याम कुमार बर्वे, आमदार आशिष जयस्वाल सह संबंधित विभागाच्या अधिकार्यांना निवेदन देऊन जुने कन्हान पोलीस स्टेशन ते धन्यवाद गेट पर्यंत गतिरोधक बनवुन अपघातास रोकथाम करण्यात यावे.

# अठराभुजा गणेशाच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ११ :

विदभार्तील प्रसिद्ध अठराभुजा गणपती मंदिरात गणेशोत्सवाचा थाटात शुभारंभ झाला आहे. याअनुषंगाने विविध धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

रामटेक शहराच्या मध्यवस्तीत शास्त्री वार्डात गडमंदिराच्या पायथ्याशी श्री अठराभुजा गणेशाचे मंदिर आहे.या मंदिराची व श्री गणेशाची कथा वैशिष्ट्यपुर्ण आहे.५०० वर्षापेक्षा जास्त प्राचिन इतिहास असलेली ही अठराभुजा असलेली ही मुर्ती विदर्भातच नव्हे तर संपुर्ण महाराष्टात एकमेव असावी. अठराभुजा गणेशाची मुर्ती पांढऱ्या शुभ्र स्फटिकाची असुन मुर्तीच्या अठराभुजा स्पष्टपणे दिसतात.या एकाच मंदिरात गणेशाच्या तिनही रूपाचे महागणपती, रिद्धि-सिद्धी विनायक तथा श्री अठराभुजा गणेशाचे दर्शन होते. महालक्ष्मीजीचे दर्शन होत असल्यामुळे भाविकांना अति आनंद होतो. मन समाधानाने व चैतन्याने ओतप्रोत होते.

१६ व्या शतकात निर्माण झालेल्या या मंदिराची जबाबदारी अठराभुजा गणपती देवस्थान पंचकमेटी, रामटेक यांनी उचललेली आहे. येथे प्रत्येक गणेश चतुथीर्ला महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

नऊ दिवसीय महोत्सव तथा वर्षभर साजरा होणाऱ्या उत्सवाकरिता मंडळाचे अध्यक्ष हुकुमचंद बडवाईक, रितेश चौकसे, विजय सलामे, ऋषिकेश किंमतकर, गुड्डु बघेले, रवी मथुरे, नितीन चिंतलवार, महेंद्र खोडे, मोरेश्वर धावडे, श्याम महाजन, राहुल मडावी, गोलु खेडकर, खुशाल धावडे, धावडे यांच्यासह मंडळाचे सर्व स्वंयसेवक कार्यरत आहे.

# नवेगाव खैरी धरणाचे १५ दरवाजे उघडले



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात गेल्या 2 दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे पारशिवनी तालुक्यातील नवेगाव खैरीचे 16 पैकी 15 दरवाजे उघडण्यात आले असून, त्यामुळे नदीकाठावर राहणाऱ्या नागरिकांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

सोमवारी आणि मंगळवारी रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मध्य प्रदेशातील चौराई धरण पूर्णपणे भरले. चौराई धरणातून पाणी सोडल्यामुळे पारशिवनी तालुक्यातील नवेगाव खैरी धरणही १०० टक्के भरले असून, धरणाचे १५ दरवाजे उघडण्यात आले आहेत. धरणाचे दरवाजे उघडल्यापासून कन्हान नदीत 1733.546 क्युसेकपेक्षा जास्त पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

धरणाचे सर्व 15 दरवाजे उघडण्यात आले असून, यामध्ये 8 दरवाजे 1 मीटरपर्यंत तर 6 दरवाजे दीड मीटरपर्यंत उघडण्यात आले आहेत. सोमवार ते मंगळवारी रात्री उशिरापर्यंत सुमारे 1093.2 मिमी पावसाची नोंद झाली आहे. तर पारशिवनी तहसीलदार राजेश भांडारकर यांनी हरकती व्यवस्थापन पथकाला सतर्कतेच्या वळणावर ठेवले आहे.

# योगेश माझी बोरगांव आष्टी खुर्दच्या तंटामुक्त गांव समितीच्या अध्यक्षपदी



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ११ :

नागपूर तालुक्यातील फेटरी जवळील बोरगांव आष्टी खुर्दच्या महात्मा गांधी तंटामुक्त गांव समितीच्या अध्यक्षपदी समाजसेवक योगेश अशरफीलाल माझी यांची ग्रामसभेमध्ये सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व सर्व ग्रामस्थानच्या सहमतीने निवड करण्यात आली. योगेश माझी यांचे सरपंच शशिकला राजेश नितनवरे उपसरपंच रोशन खाडे, ग्रा.पं. सदस्य बादल पाटिल, प्रतिभा पांडे, अर्चना तकित, वैशाली सरोदे, आम्रपाली भांगे , कमलेश पुंड व उपस्थित गावकरी यांनी अभिनंदन केले.

# गणेश उत्सवातून एकतेची ऊर्जा मिळते : अजय मते



■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. ११ :

बुद्धीदाता व कलेचा अधिपती श्री गणेशाचा पारंपारिक गणेश उत्सव देशभरात उत्साहात साजरा केला जातो. महाराष्ट्रात श्री. गणेश उत्सवाच्या माध्यमातून परंपरा व संस्कृतीचे मुळे खोलवर रुजली आहेत. पारंपारिक गणेश उत्सवातून तरुणांच्या बुद्धीला विस्तार व कल्पकतेला वाव मिळतो. नवीन ऊर्जा प्राप्त होते, असे महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाचे सचिव तथा तरुण भारत तालुका प्रतिनिधी मौदा अजय मते यांनी बोलतांना व्यक्त केली.

श्री गणरायाची स्थापना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष शैलेश रोशनखेडे यांच्या निवासस्थानी करण्यात आली. त्यांच्या निवासस्थानी भोजनाचा कार्यक्रम सुद्धा आयोजित करण्यात आला होता.

श्री गणरायाचे चरणी प्रार्थना करून दर्शन घेण्यात आले. यात उपस्थित मौदा येथील पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे, मनीरामजी यादव, राजू सोमनाथे, देवू कुंभलकर, डॉ. आशीष सावरकर, शुभम तिघरे, शरद भोयर, किशोर सैंडल, नानेश्वर वानखेड़े, दामोदर चूटे, विक्की साठवने,शैलेश रोशनखेडे, तुषार कुंजेकर, महेंद्र चकोले. तुकाराम लुटे. नाना नानवटकर, निलेश रोशनखेडे, आदी उपस्थित होते.

# तुमसर-गोबरवाही दरम्यान १०५०/ १०-१२ किमी वर मावनसह लेव्हल क्रॉसिंग



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ११ :

सुरक्षित, सुरक्षित आणि जलद, त्रासमुक्त ट्रेन चालवणे हे दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे उद्दिष्ट आहे. दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागाने तुमसर-गोबरवाही सेक्शन किमी मध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने लेव्हल क्रॉसिंग गेट्सची नियमित देखभाल केली आहे. 1050/10-12 येथे स्थित मानवी पातळी क्रॉसिंग क्र. 532 14-09-2024 रोजी रात्री 10.00 ते 21-09-2024 रोजी सकाळी 08.00 वाजेपर्यंत तात्पुरते बंद ठेवण्यात आले आहे आणि यादरम्यान, ते जवळच्या रेल्वे ओव्हर ब्रिज आणि लेव्हल क्रॉसिंग क्र. 533 सुकडी गेटवरून रस्ते वापरकर्त्यांना वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

# डॉ. रसिका गोंधले मिसेस इंडिया सुपरनॅशनल २०२४ विजेती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

मिसेस इंडिया सुपरनॅशनल 2024 सौंदर्य स्पर्धा जोया सिराज शेख यांनी 1 सप्टेंबर 2024 रोजी मुकेश पटेल सभागृह, मुंबई येथे आयोजित केली होती. या स्पर्धेत आठ राज्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आठ महिलांनी सहभाग घेतला असून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या डॉ.रसिका राजीव गोंधले हिने प्रथम उपविजेतेपद पटकावले.

डॉ. रसिका गोंधले या सध्या गोविंदराव वंजारी आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्र नागपूर येथे उप-वैद्यकीय अधीक्षक म्हणून कार्यरत असलेल्या जनरल सर्जन आणि नागपूर दूरदर्शनच्या "आरोग्य संपदा" कार्यक्रमाच्या अँकर आहेत. ती एक थिएटर आर्टिस्ट आहे, अभिनयाची आवड असल्याने ती राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय नाटक स्पर्धा आणि व्यावसायिक नाटकांमध्येही काम करते.



तिने सौंदर्य स्पर्धांमध्ये मिसेस भंडारा 2017, मिसेस नागपूर 2018, मिसेस विदर्भ 2019, मिसेस महाराष्ट्र 2023 ही खिताब जिंकले आहेत. त्यांचा कार्यकाळ लक्षात घेऊन लोकमतने त्यांना सखी सन्मान पुरस्कार 2017 देऊन गौरविले आहे. तिला राणी लक्ष्मीबाई पुरस्कार 2022, टॅलेंट अवॉर्ड 2023, ग्लोबल आयकॉन्स ऑफ इंडिया अवॉर्ड 2024 इत्यादींसह इतर अनेक प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले आहेत. आता मिसेस इंडिया सुपर नॅशनल जिंकल्यानंतर ती मिस युनिव्हर्स स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. असे पत्र परिषदेत सांगितले यावेळी डॉ. रसिका गोंधले, मेघा कपूर, जोया शेख उपस्थित होत्या.

## निधन वार्ता

### सोमाजी वाघमारे



■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. ११ :

राजीवनगर, वानाडोंगरी निवासी सोमाजी सुखदेव वाघमारे (वय ७६) यांचे बुधवारी (११) सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज (१२) दुपारी २ वाजता वानाडोंगरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पाठीमागे बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाने संपूर्ण परिवारावार शोककळा पसरली आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# मध्य रेल्वे नागपूर ते पुणे दरम्यान सहा साप्ताहिक चालवणार आहे सुपर फास्ट विशेष गाड्या

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ११ :

मध्य रेल्वेने दिवाळी आणि छठ सणांच्या पार्श्वभूमीवर नागपूर ते पुणे दरम्यान सहा साप्ताहिक सुपर फास्ट विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या विशेष गाड्या २६ सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत धावतील. नागपूर-पुणे स्पेशल ट्रेनसोबतच मध्य रेल्वे लोकमान्य टिळक टर्मिनस-नागपूर आणि नागपूर-समस्तीपूर स्पेशल ट्रेनही चालवणार आहे.

गाडी क्रमांक 01209 नागपूर-पुणे सुपर-फास्ट एसी स्पेशल 26 सप्टेंबर ते 09 नोव्हेंबर दरम्यान दर शनिवारी नागपूरहून 19.40 वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी 11.25 वाजता पुण्याला पोहोचेल.

तर, 27.10.2024 ते 10.11.2024 पर्यंत, गाडी क्रमांक 01210 पुणे-नागपूर सुपर-फास्ट एसी स्पेशल रविवारी पुण्याहून 15.50 वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी 06.30 वाजता नागपूरला पोहोचेल.

या विशेष गाड्या वर्धा, धामणगाव, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड चोर मार्ग आणि उरुळी स्थानकांवर थांबतील.

छळळ-नागपूर-छळळ साप्ताहिक सुपर-फास्ट स्पेशल (4 सहली)

०२१३९ एलटीटी-नागपूर सुपर-फास्ट स्पेशल एलटीटीवरून ३१.१०.२०२४ ते ०७.११.२०२४ या कालावधीत दर गुरुवारी ०.२५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी १५.३० वाजता नागपूरला पोहोचेल.

02140 नागपूर-एलटीटी सुपरफास्ट स्पेशल शुक्रवारी 01.11.2024 ते 08.11.2024 दरम्यान नागपूरवरून 13.30 वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी 04.10 वाजता एलटीटीला पोहोचेल.

**थांबेः** ठाणे, कल्याण, नाशिकरोड, मनमाड, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव, वर्धा.

नागपूर-समस्तीपूर-नागपूर साप्ताहिक सुपर-फास्ट स्पेशल (6 सहली)

01207 नागपूर-समस्तीपूर सुपर-फास्ट स्पेशल 30.10.2024 ते 13.11.2024 पर्यंत दर बुधवारी नागपूरहून 10.40 वाजता सुटेल आणि त्याच दिवशी 21.30 वाजता समस्तीपूरला पोहोचेल.

01208 समस्तीपूर-नागपूर सुपर-फास्ट स्पेशल गुरूवारी 31.11.2024 ते 14.11.2024 दरम्यान समस्तीपूर येथून 23.45 वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी 07.00 वाजता नागपूरला पोहोचेल.

**थांबेः** बैतूल, इटारसी, भोपाळ, बिना, वीरांगना लक्ष्मीबाई झांसी, कानपूर सेंट्रल जंक्शन, ऐश बाग जंक्शन, बारा बांकी जंक्शन, गोंडा, बस्ती, गोरखपूर, छपरा, हाजीपूर ज्युनियर, मुझफ्फरपूर.


## महसूल विभाग
### तहसिलदार, कामठी यांचे कार्यालय

दुरध्वनी क्रमांक :- ०७१०९-२९५००९ Email ID tahsildarkamptee@gmail.com
प्रस्तु-४ ना.तह. कामठी/कावि. २५१-२०२४ दिनांक: ०४/०९/२०२४

वाचा - १. जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम ३ २. जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ ३. भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४. मा. जिल्हा दंडाधिकारी यांचे कडील आदेश क्रमांक अ.का./डी-१/ जन्म मुत्यु आदेश/ कावी १५८/२०२३, दि.११.०५.२०२४
५. अमेदार श्री/श्रीमती जगन्नाथ जोखुराम शाहु रा. प्लॉट नं. ३९ येरखेडा ता. कामठी जि. नागपुर यांचा अर्ज दि.२१/०८/२०२४ प्राप्त दिनांक २९/०८/२०२४

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार, श्री. जगत्राथ जोखुराम शाहु रा. प्लॉट नं. ३९ येरखेडा तह-कामठी, जिल्हा-नागपुर यांनी त्यांचे वडील नामे जोखुराम माताबदल शाहू यांचे मृत्यू नोदीसाठी महाराष्ट्र जन्म/मुत्यु अधिनियम १९६९ चे कलम ११ (२) व (३) अन्वये मुत्यु नोंद ग्रामपंचायन येरखेडा याचे दप्तरी घेण्याकरीता आदेशीत करणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहु अर्जदार, यांच्या वडीलांचा मुत्यु दिनांक १९/०३/२०२० ला येरखेडा येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे अर्जदार यांना त्यांच्या वडीलांचा मुत्यु प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरीता आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअधा मी कार्यकारी दंडाधिकारी, कामठी उपरोक्त वाचा क्र. १. आणि २ नुसार व ३ व ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मुत्यु नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरीता व गृह चौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणत्याही हितसंबंधाचे काही आक्षेप/उजर/ हरकती असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारासह नायब तर्हामलदार दंडाधिकारी, कामठी यांचे न्यालयात स्वताः या कार्यालयात जातोने / वकीला मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप/उजर / विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मुत्यु बाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित मुत्यु नोंदीबाबतचा ओदश निर्गमीत करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

| अनु.क्र. | मुत्यु व्यक्तीचे नाव | अर्जदाराशी नाते |
|---|---|---|
| १. | जोखुराम माताबदल शाहु | मुलगा |

(आर.एच.बमनोटे)
नायब तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, कामठी



## जाहीर नोटिस

आम जनतेस या जाहिर नोटिस द्वारे सूचित करण्यात येते की, माझे **पक्षकार दिलीप शामराव शेंडे राह. निमखेडा ता. मौदा जि. नागपूर** यांनी मौजा निमखेडा ता. मौदा जि.नागपूर येथील जुना गट क्र. १४९/६ नवीन गट क्र. १४९/६/९ प्लॉट क्र. ०९ आराजी १६२.०० चौ.मी. व त्यावरील चतु:र्सिमा पुर्वेस -गट क्र.१४९ यांचे शेत,पश्चिमेस - ९ मिटर लेआउट रोड, उत्तरेस - प्लॉट क्र.१०,दक्षिणेस -प्लॉट क्र.०८ आहे.

सदर प्लॉट माझा पक्षकाराने अटलोरी राम मोहनराव व अटलोरी शोभारानी राम मोहनराव यांच्याकडून दिनांक १३/०५/२००५ दस्त क्र.९८५/२००५ अन्वये खरेदी केली आहे. परंतू उपरोक्त दस्त क्र. ९८५/२००५, दि. १३/०५/२००५ ची मुळ प्रत गहाळ झालेली आहे. सदर उपरोक्त मालमत्ता विक्रीपत्रान्वये माझे पक्षकाराचे नाव राजस्व अभिलेखात मालक व कब्जेदार म्हणून दर्ज करण्यात आलेले आहे.

सदर वरील वर्णन केलेल्या मालमत्तेचे माझे पक्षकार एकमेव मालक नाहीत असे कुणासही समजायचे असेल किंवा सदर मालमत्तेच्या माझे पक्षकाराचे मालकी हक्काविषयी कुणालाही कोणताही आक्षेप असल्यास हा नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह खालील पत्यावर आक्षेप सादर करावा.

अन्यथा माझे पक्षकार सदर मालमत्तेचे एकमेव मालक व कब्जेदार आहेत असे कायदेशिर रित्या गृहित धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**भंडारा** **पक्षकार तर्फे अधिवक्ता**
**दिनांक - ११/०९/२०२४ (अँड. जयंत .जे. बिसेन)**
**मो. क्र. ९३२६१११६१७**

# आयकर क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी बदलत्या काळानुसार नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक : प्रो.श्रीकृष्ण देव राव

## राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी येथे प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
जागतिकीकरणामुळे सर्वच क्षेत्रात डिजिटल क्रांती घडून आली असून आयकर आणि करसंकलन क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी बदलत्या काळानुसार नवनवीन तंत्रज्ञान वेळोवेळी शिकत राहणे क्रमप्राप्त असल्याचे प्रतिपादन हैदराबाद येथील नॅशनल अकॅडमी ऑफ लीगल स्टडीज अँड रिसर्च - नालसार विधी विद्यापीठाचे कुलगुरु प्रो.श्रीकृष्ण देव राव यांनी केले.

नागपूरच्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी - एनएडीटी येथे आयोजित सात आठवडे कालावधीच्या 'उत्तरायण-२' 2024 या प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी एनएडीटीचे प्रशिक्षण महासंचालक आनंद बैवार, अतिरिक्त महासंचालक (प्रशासन) मनीष कुमार तसेच या प्रशिक्षणाचे प्रशिक्षण संचालक एस.एम.वी.वी. शर्मा आणि अतिरिक्त महासंचालक आकाश देवांगण हे प्रामुख्याने उपस्थित होते.

आयकर अधिकाऱ्यांनी कायद्याचे ज्ञान आणि कायद्याचे तत्त्व याविषयी आपली कौशल्य अजून संवर्धित करून आपली निर्णय क्षमता अजून वृद्धिंगत करावी असेही प्रो.श्रीकृष्ण देव राव यांनी सांगितले. प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉन्ड्रीग ॲक्ट अर्थात पीएमएलए हा नवीन फौजदारी कायद्यासारखा काम करत आहे.

तसेच नवीन साक्ष कायद्यातंर्गत तांत्रिक पुरावा हा अमुलाग्र बदल घडवीत आहे. या दोन कायद्यांचा आणि आयकर क्षेत्रातील विविध नियम आणि कायदे यावर अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष द्यावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

नवपदोन्नत आयकर सहायक आयुक्तांसाठी ह्यउत्तरायण-क्क -2024 या प्रशिक्षण वर्गात एकूण 116 अधिकाऱ्यांची असून




यामध्ये महिला अधिकाऱ्यांची संख्या 20 एवढी आहे. या प्रशिक्षण वर्गात 18 राज्य आणि दोन केंद्रशासित प्रदेशातून अधिकारी सहभागी झालेली असून यामध्ये बिहार राज्यातील सर्वाधिक अधिकारी त्या पाठोपाठ महाराष्ट्र आणि विविध राज्यातील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. प्रशिक्षण वर्गातील सर्वाधिक तरुण अधिकारी हे 45 वर्षाचे असून सर्वात ज्येष्ठ अधिकारी हे 59 वर्षाचे आहे या तुकडीचे सरासरी सेवा वय हे 52 असल्याचे राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीचे संयुक्त संचालक एस.एम.व्ही शर्मा यांनी याप्रसंगी सांगितले. कार्यक्रमा प्रसंगी नवपदोन्नत आयकर सहाय्यक आयुक्तांनी कर प्रशासकाची शपथही घेतली.

आयकर विभागाची राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी ही भारतीय महसूल सेवेतील (आय.आर.एस) अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणारी अग्रणी संस्था आहे. या प्रशिक्षणात प्रत्यक्ष कर वसुली व करचुकवेगिरीला आळा घालण्याच्या प्रमुख कार्याच्या प्रशिक्षणाशिवाय अधिकाऱ्यांना पैशाच्या गैरव्यवहारासारख्या आर्थिक गुन्हे व विविध आर्थिक घोटाळे यांचा सामना करण्यासाठी सक्षम केले जाते. या प्रशिक्षण वर्गात केंद्र सरकार निर्देशित "मिशन कर्मयोगी" चे उद्दिष्ट साध्य होणार असून या प्रशिक्षण वर्गात "अनुशीलन प्रकल्प"राबविणार आहे ज्या अंतर्गत डिजिटल कंटेंट क्रिएशन साठी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाला आयकर विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# सिंदी रेल्वे स्थानकावर "स्टेशन महोत्सव" साजरा




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
मध्य रेल्वे नागपूर विभागातर्फे 10 सप्टेंबर 2024 रोजी सिंदी रेल्वे स्थानकावर "स्टेशन महोत्सव" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश समृद्ध इतिहास आणि रेल्वे यंत्रणेच्या स्थापनेचा सन्मान करणे हा आहे.

"स्टेशन महोत्सव" या कार्यक्रमाने रेल्वेचे ऐतिहासिक महत्त्व आणि त्यांच्या सामाजिक योगदानाबाबत जनजागृती करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम केले. यात गावकरी, रेल्वे कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय यांचा सक्रिय सहभाग लाभला, ज्यामुळे या प्रसंगी सामुदायिक भावना निर्माण झाली.
स्टेशन मास्टर, स्टेशन कर्मचारी आणि गावातील लोकांसह प्रमुख व्यक्तिमत्त्वांच्या उपस्थितीने हा कार्यक्रम रंगला.

"स्टेशन महोत्सव" हा कार्यक्रम तरुण पिढीमध्ये रेल्वेच्या वारशाबद्दल अभिमान आणि कौतुकाची भावना आहे.

मध्य रेल्वेने समुदायाच्या सहभागाला चालना देण्यासाठी आणि रेल्वे क्षेत्रातील विकासात्मक प्रगतीबद्दल जागरुकता पसरवण्याच्या आपल्या समर्पणाची पुष्टी करते.

# वाडीत शासकीय योजना माहिती शिबीराचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ११ :
दत्तवाडीतील न्यू मंगलधाम सोसायटीतील सार्वजनिक शिवमंदीरात महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची माहिती आणि त्या संदभार्तील अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी मंगळवार १० सप्टेंबर रोजी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आमदार समीर मेघे यांच्या मार्गदर्शनानुसार भाजप वाडी मंडळ उपाध्यक्ष तथा शिव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष कमल कनोजे यांच्या पुढाकाराने शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये माझी लाडकी बहीण, इमारत बांधकाम कामगार कल्याणकारी योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना आदी शासकीय योजनांची माहिती देऊन आवश्यकतेनुसार अर्जही भरण्यात आले. शासकीय योजनांची माहिती व अर्ज सादर करण्यासाठी सुरज राऊत, प्राची भैसारे, शितल हिंगणे, श्रृष्टी भुते यांनी सहकार्य केले. योजनांचा लाभ घेण्यासाठी परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. या सर्व शासकीय योजना महिला व युवकांसाठी फायदेशीर ठरणार असल्याचे आयोजक कमल कनोजे यांनी सांगितले.

# स्व. अनिलकुमार स्मृती पत्रकारिता पुरस्काराचे १४ सप्टेंबर रोजी वितरण






■ महासागर प्रतिनिधी
नागपूरी, दि. ११ :
स्व. अनिलकुमार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विदर्भ गौरव प्रतिष्ठान आणि नागपूर श्रमिक पत्रकार संघाच्या संयुक्त वतीने वर्ष २०२३ च्या पुरस्काराचे यावर्षी शनिवार १४ सप्टेंबर रोजी वितरण केले जाणार आहे.

१३ सप्टेंबर हा स्व. अनिलकुमार यांचा स्मृतिदिवस. स्व. अनिलकुमार हे स्वातंत्र्यपूर्व काळातील ज्येष्ठ कवी, विचारवंत व पत्रकार म्हणून प्रसिद्ध होते. त्या काळात त्यांनी केलेले कार्य आजही लोकांच्या स्मरणात आहे. स्वातंत्र्य संग्रामात देखील त्यांचा सहभाग होता. स्व. अनिलकुमार यांच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी विदर्भ गौरव प्रतिष्ठान आणि नागपूर श्रमिक पत्रकार संघाच्या संयुक्त वतीने मागील चार दशकांपासून विदभार्तील पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांचा 'स्वर्गीय अनिलकुमार पत्रकारिता पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात येत असतो, प्रत्येकी रोख २१ हजार रुपये, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

२०२३ च्या पुरस्कारासाठी दै. लोकमतचे (विदर्भ आवृत्ती) संपादक श्रीमंत बाळकृष्ण माने, द इंडियन एक्सप्रेस मधून सहायक संपादक म्हणून निवृत्त विवेक देशपांडे, द टाईम्स ऑफ इंडियाचे ज्येष्ठ पत्रकार रामू भागवत आणि दै. लोकसत्ता येथे कार्यरत विजय (राम) मधुकर भाकरे यांची निवड करण्यात आली आहे. प्रेस क्लब, सिव्हील लाईन, नागपूर येथे शनिवार १४ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अरूण चौधरी राहतील. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रम्हाशंकर त्रिपाठी यांनी केले आहे.

# तान्हा पोळ्यातील बच्चे कंपनीचा ठाणेदारांनी वाढवला उत्साह




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
आठवडाभरापूर्वी साजरा झालेल्या तान्हा पोळ्याच्या दरम्यान सदर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनिष ठाकरे यांनी मुलांच्या वेशभूषेची व बैलांच्या सजावटीची पाहणी करून मुलांना प्रोत्साहन दिले.

याप्रसंगी बच्चे कंपनीसह पालक उपस्थित होते. त्यांच्या वेशभूषा व सजावटीसाठी द्वितीय पारितोषिक 2000 रुपए, तृतीय पारितोषिक 1000 रुपए ठाकरे, एपीआय श्रीमती देशकर यांच्या हस्ते देण्यात आले.

कार्यक्रमाचे संयोजक संदीप भूषणवार, सहसंयोजक कमलनारायण नामपाल, बज्जू बल्लक, सहसंयोजक भुरे, विनोद पन्नाल, देवा भैय्या प्रामुख्याने उपस्थित होते. सुनील अग्रवाल, संजय चोपडा, राजेश नगरकर, डॉ. सुनील पारेख, विनय बाफना, पिंटू कोट्टूरवार, मुमताज भाई, राज कनोजिया, मनीष. महल्ले, विकास मदने, प्रदीप भाई पानवाले, गुड्डू मिश्रा, अंकित गौर, सदर ठाण्याचे पोलीस कर्मचारी आणि मान्यवर उपस्थित होते.

# गैरहजर स्वच्छता कर्मचाऱ्यांवर कारवाई करा : मनपा आयुक्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सकाळी लक्ष्मीनगर आणि धरमपेठ झोनमधील स्वच्छता कायार्ची पाहणी केली. त्यांनी कामावर गैरहजर असलेल्या कामचुकार स्वच्छता कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश झोनचे उपायुक्त मिलिंद मेश्राम आणि प्रकाश वराडे यांना दिले. त्यांनी हजेरी स्टॅंडमध्ये कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीचा आढावा घेतला आणि पूर्वसूचनेविना गैरहजर कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्याचे निर्देश दिले.

आयुक्तांनी आठ रास्ता चौक, आर.एस. कॉन्व्हेंट, बजाज नगर आणि इतर ठिकाणी स्वच्छता कायार्ची पाहणी केली. या पाहणी दरम्यान त्यांनी कुठेही कचऱ्याचे ढिगारे दिसू नये, याबाबत सक्त ताकीद दिली. हिरवा कचरा त्वरित उचलला जावा याकरिता अतिरिक्त यंत्रणा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. सफाई कर्मचाऱ्यांद्वारे उचलण्यात आलेला कचरा पुनःश्च प्रभागात सार्वजनिक जागी कचरा न टाकता थेट भांडेवाडी डम्पिंग यार्ड ला पाठविणे आवश्यक आहे. यासाठी कंत्राटदारांनी कॉम्पॅक्टरद्वारे कचरा थेट भांडेवाडी डम्पिंग यार्डला पाठविण्या संबंधी आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी स्पष्ट निर्देश दिले. लक्ष्मीनगर आणि धरमपेठ झोनमधील दररोज गैरहजर राहणाऱ्या कामचुकार कर्मचाऱ्यांवर सक्त कारवाई करण्याबाबत मनपा आयुक्तांनी, उपायुक्त तथा संचालक घनकचरा व्यवस्थापन विभागाचे डॉ.गजेंद्र महल्ले, झोनल स्वच्छता अधिकारी श्री. रामभाऊ तिडके, श्री. दीनदयाल टेंभेकर आणि स्वच्छता निरीक्षक राजेंद्र शेट्टी तसेच सहायक आयुक्तांची जबाबदारी निश्चित केली आहे.

## १.४८ लाखाची घरफोडी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
कुटुंब बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत सोन्याचांदीच्या दागिन्यांसह 1 लाख 48 हजार 600 रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना मानकापूर पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली.

पोलिसांनी विलास प्रभाकर येमदे (42) रा. झिंगाबाई टाकळी, गोधनी रोडच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. येमदे कुटुंब हे मुळचे छिंदवाडाच्या बानाबाकोडा येथील रहिवासी आहे. गत 7 सप्टेंबरला संपूर्ण कुटुंब घराला कुलूप लावून मुळगावी गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचा कडीकोंडा व कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरुमच्या कपाटातून रोख 600 रुपये व सोन्याचांदीचे दागिने असा एकूण 1,48,600 रुपयांचा माल चोरून नेला. सोमवारी येमदे कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली.

# मध्य रेल्वे नागपूर विभागाकडून बल्लारशाह येथे रोड मोबाईल अपघात मदत ट्रेन तैनात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
आपत्ती व्यवस्थापन क्षमता बळकट करण्याच्या दिशेने एक सक्रिय पाऊल उचलत, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने बल्हारशाह येथे रोड मोबाईल अपघात मदत ट्रेन अधिग्रहित करून आणि तैनात करून महत्त्वपूर्ण झेप घेतली आहे. बल्हारशाह हे विभागाच्या दक्षिणेकडील एक प्रमुख जंक्शन आहे, जेथे कोळसा, लोह खनिज आणि इतर गंभीर साहित्य वाहून नेणाऱ्या मालगाड्यांची जास्त रहदारी असते, कारण त्यात अनेक कोळसा साइडिंग, लोह खनिज साईडिंग आणि पॉवर प्लांट्स आहेत. कडक सुरक्षा प्रोटोकॉल असूनही, या मोठ्या प्रमाणात वाहतूक केलेल्या साइडिंगवर अपघात होऊ शकतात.




अलीकडेच, 132 किमी अंतरावर वर्धा येथे सर्वात जवळचे आपत्ती व्यवस्थापन युनिट तैनात करण्यात आले होते, परिणामी बल्हारशाह परिसरातील अपघातांना प्रतिसाद देण्यासाठी 3 ते 4 तासांचा विलंब झाला. ही तफावत भरून काढण्यासाठी आणि आपत्कालीन प्रतिसाद वेळेत सुधारणा करण्यासाठी, रोड मोबाईल एआरटी युनिट आता थेट बलहारशाह येथे तैनात करण्यात आले आहे.

हे मोबाईल युनिट रस्त्यावरून त्वरीत तैनात केले जाऊ शकते, ज्यामुळे पारंपारिक रेल्वे-बाउंड एआरटी युनिट्सच्या तुलनेत अपघाताच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी लागणारा वेळ लक्षणीयरीत्या कमी होतो. रोड मोबाईल एआरटीची गतिशीलता आपत्कालीन परिस्थितींना जलद, अधिक कार्यक्षम प्रतिसाद, ट्रेन ऑपरेशन्समध्ये व्यत्यय कमी करणे आणि इंजिन, लोको पायलट आणि ट्रेन व्यवस्थापक यासारख्या मौल्यवान संसाधनांचे जतन करणे सुनिश्चित करते. मनीष अग्रवाल, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम), नागपूर विभाग आणि अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एस. खैरकर आणि वरिष्ठ विभागीय यांत्रिक अभियंता मोहित मांडलेकर यांच्या नेतृत्वाखालील ही धोरणात्मक वाटचाल, प्रदेशाची आपत्ती सज्जता वाढवते. बल्हारशाह येथे रोड मोबाईल एआरटी युनिटच्या तैनातीमुळे अपघातांना जलदगतीने संबोधित करण्याच्या विभागाच्या क्षमतेमध्ये मोठी सुधारणा झाली आहे, ज्यामुळे किमान नुकसान आणि रेल्वेच्या कामकाजात व्यत्यय निर्माण होईल.

# साडेचारशे शिक्षकांच्या जागा होणार कमी

## जिल्हा परिषदेत कंत्राटी शिक्षक नियुक्तीच्या निर्णयाला विरोध




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
जिल्हा परिषद शाळांमध्ये कंत्राटी शिक्षण नेमण्याचा प्रयत्न राज्य सरकारकडून होत आहे. याला सर्वस्तरातून विरोध होत आहे. या निर्णयामुळे नागपूर जिल्ह्यात जिल्हा परिषद शिक्षकांच्या साडेचारशे जागा कमी होण्याची शक्यता आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या २० किंवा २० पेक्षा कमी पटाच्या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षक अथवा डी.एड पदविका धारक बेरोजगार युवकांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्याच्या राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून यापूर्वीच १५ मार्च रोजी संच मान्यतेबाबत सुधारित निकषाबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला होता.

त्यामध्येच कमी पटाच्या शाळा या कंत्राटी शिक्षकांच्या माध्यमातून चालविण्यात येईल, याबाबत सूतोवाच करण्यात आले होते. ५ सप्टेंबरच्या शासन निर्णयाद्वारे त्याला मूर्त रूप देवून शासनाकडून शिक्षक दिनाच्या दिवशी शिक्षकांचा सार्वजनिकरित्या अनादर करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी केला आहे. व्यावसायिक पात्रता अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण करून नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. असे असताना कंत्राटी शिक्षक नियुक्तीमुळे राज्यात शिक्षकांच्या तब्बल १४ हजार ७८३ तर नागपूर जिल्ह्यात साडेचारशे जागा कमी होणार आहेत. शिक्षक, शाळा व विद्यार्थ्यांना जाचक ठरणारे १५ मार्च व ५ सप्टेंबरचे शासन निर्णय रद्द करावे अन्यथा त्याविरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष लीलाधर ठाकरे, सरचिटणीस निळकंठ लोहकरे, सुरेश श्रीखंडे, प्रकाश सव्वालाखे, सुरेंद्र कोल्हे, धर्मेंद्र गिरडकर, उज्वल रोकडे, विजय उमक, दिगांबर ठाकरे, मीनल देवरणकर, पुष्पा पानसरे, कल्पना इंगळे, अशोक तोंडे, अनिल श्रीगिरीवार, रामदास फड, सुरेश भोसकर, अनिल वाकडे, अशोक बांते, अंकुश कडू, शैला भिंगारे, दशरथ मोरे, दीपक उमक यांनी दिला आह राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. ही रिक्त पदे भरून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासाला चालना देण्याऐवजी ऐन शिक्षक दिनाच्या दिवशी शासनाने कमी पटाच्या शाळांमध्ये कंत्राटी शिक्षक नियुक्तीचा शैक्षणिक गुणवत्ता विकासाला बाधक ठरणारा शासन निर्णय निर्गमित केला.

# ऑगस्ट २०२४ मध्ये व्यापारातून ११२.७६ कोटी, तिकीट विक्रीतून २३.२१ कोटी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
नमिता त्रिपाठी, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर यांच्या नेतृत्वाखाली, विभागाला ऑगस्ट 24 मध्ये 1.13 दशलक्ष टन मालवाहतुकीतून 112.76 कोटी रुपये मिळाले, जे त्याच तुलनेत 3.67% आहे. गेल्या वर्षीर्चा कालावधी आणि भाड्यात 3.62% वाढ दर्शवते.

तिकीट तपासणी क्षेत्रात, ऑगस्ट 2024 मध्ये, दिलीप सिंह - वरिष्ठ विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, तिकीट तपासणी मोहीम अधिकारी आणि तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांच्या सहकार्यानें विविध गाड्या आणि रेल्वे स्थानकांवर राबवली. , विना तिकीट/अनियमित प्रवास आणि एकूण 47 लाख रुपये धुम्रपानाच्या 80 प्रकरणांमधून वसूल केले गेले रेल्वे परिसरात कचरा टाकणाऱ्या ४८३ प्रवाशांकडून दंड वसूल करण्यात आला. 51,050/- समाविष्ट आहे. प्रवासी वाहतूक अंतर्गत, ऑगस्ट 24 मध्ये एकूण तिकीट विक्री 1.75 दशलक्ष ते रु. 23.21 कोटी रुपये कमावले, तर पार्किंगमधून 2.81 लाख रुपये आणि जेवणातून 7.73 लाख रुपये जमा झाले. याशिवाय 01.08.2024 ते 31.08.2024 पर्यंत पार्सल लोडिंग अंतर्गत 1021 टन पार्सल लोडिंग करण्यात आले. उत्पन्न 27.43 लाख रुपये होते.

तर ऑगस्ट महिन्यात, बिगर भाडे महसूल क्षेत्रातील चांगल्या कामगिरीचा परिणाम म्हणून रु. 36.20 लाख रु 100,000 रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले जे मागील वर्षीच्या याच कालावधीपेक्षा 218% अधिक आहे आणि मुख्यालयाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टापेक्षा 33% अधिक आहे.

रेल्वे प्रवाशांनी प्रवासादरम्यान रेल्वे नियमांचे पालन करून योग्य तिकीट काढून प्रवास करावा, असे आवाहन दिलीप सिंग-वरिष्ठ विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक यांनी केले आहे. काउंटरवरील रांगा टाळा आणि सहज अनारक्षित तिकीट बुकिंगसाठी वळर ॲप वापरून तुमचा प्रवास सुरळीत करा आणि तुमच्या घरच्या आरामात सीझन तिकीट (टरळ) जारी करा आणि नूतनीकरण करा.

# कर्णबधिर दिव्यांगांना शस्त्रक्रियेसाठी अर्थसहाय्य योजना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
नागपूर महानगरपालिकेच्या समाज विकास विभागांतर्गत कर्णबधिर दिव्यांगांना कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहे, श्राव्य शक्ती निर्माण करण्यासाठी ० ते ६ वयोगटातील मुलांना शस्त्रक्रियेकरिता ६ लाख रुपयांपर्यंत अर्थसहाय्य देण्यात येत असून, योजनेचा अधिकाधिक संख्येत लाभ घ्यावा असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले की, यावर्षी नागपूर शहरातील दिव्यांगासाठी सखोल सर्वेक्षण करण्याचा मनपाचा मानस असून, दिव्यांगाशी निगडीत भौतिक माहितीसोबत त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थिती बरोबरच त्यांना स्वावलंबी बनविण्याकरिता व त्यांची नैसर्गिक आवड व क्षमता प्रमाणे नवीन योजना सूरू करण्यात येणार आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात व अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांच्या नेतृत्वात समाज विकास विभागांतर्गत दिव्यांगांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत.

यातील कर्णबधिर दिव्यांगांना कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी अर्थसहाय्य ही योजना राबविण्यात येत आहे. याबद्दल माहिती देत उपायुक्त डॉ. रंजना लाडे यांनी सांगितले की, कर्णबधिरत्य/कर्णदीप हे भाषावाढीसाठी व वाचा विकासासाठी अत्यंत अडचणीचे ठरते. भाषा व वाचा विकासासाठी बुद्धीइतकीच निरोगी कार्णेद्रियांची गरज असते. जन्मतः कर्णबधिर असलेली मुले आजूबाजूच्या वातावरणातील तसेच बोलण्याचा आवाज ऐकू न आल्यामुळे बोलू शकत नाहीत.

परिणामी त्यांचे शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य व भावनिक नुकसान होते. खरेतर योग्य वेळेत म्हणजेच जन्मानंतर लगेच शक्य तितक्या लवकर वय 0 ते 6 वर्षे यांच्यात निदान करून त्यांच्या कानावर कॉक्लियर इम्प्लांट सारखी शस्त्रक्रिया केल्यास आणि त्यासोबत ऐकण्या-बोलण्याचे प्रशिक्षण दिल्यास कर्णबधिर मुले इतर ऐकू येणाऱ्या मुलांसारखेच शालेय शिक्षण घेऊ शकतात. सर्वसामान्य मुलासारखे बोलू शकतात.

श्रवणदोष हा वेगवेगळ्या तीव्रतेचा असून जन्मतःच कर्णबधिरत्व (ऐकू न येणे) आलेल्या मुलांना तीव्र अतितीव्र प्रमाणात कर्णबधिरत्व आलेले असते. अशावेळी श्रवणयंत्र वापरणे पुरेसे ठरत नाही. अशावेळी कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया केल्यास त्यांना इतर मुलांइतकेच ऐकू येऊ शकते.

कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी एका रुग्णास किमान सहा लाख रुपये खर्च अपेक्षित असतो. याव्यतिरिक्त औषधोपचार, थेरपी, प्रशिक्षण व इतर चाचण्यांकरिता हा आवर्ती खर्च पालकांना करावा लागत असतो. ही खर्चिक शस्त्रक्रिया असल्यामुळे बऱ्याचदा कर्णबधीर व्यक्तींना त्यापासून वंचित रहावे लागते व त्याचा भाषा-वाचा विकास व शैक्षणिक विकास खुंटतो त्यामुळे सदर योजनेचा अधिकाधिक दिव्यांगांनी लाभ घ्यावा असे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे.

सर्व दिव्यांगांना घरबसल्या योजनेचा लाभ मिळावा याकरिता मनपाच्याा संकेत स्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा व अधिकाधिक दिव्यांग बांधवानी योजनाचा लाभ घ्यावा असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले.

# बावनकुळेंच्या वाहनाची गती आरटीओ तपासणार नाही ?



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे पुत्र संकेत बावनकुळेच्या कारने रविवारी मध्यरात्री नागपुरात दोन चारचाकी आणि एका दुचाकीला धडक दिल्याचे प्रकरण सध्या संपूर्ण राज्यात गाजत आहे. या प्रकरणात नागपूर शहर आरटीओने संकेत बावनकुळे यांच्या चारचाकी वाहनाची बुधवारी पून्हा तपासणी केली.

परंतु आरटीओ या वाहनाची गती तपासणार नसल्याची धक्कादायक माहिती असल्याने पून्हा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. आरटीओचे पथक बुधवारी पून्हा सीताबर्डी पोलीस ठाण्यात गेले. या पथकाने अपघातग्रस्त वाहनाची सोमवारीही प्राथमिक निरीक्षण केले गेले होते. परंतु पथकाकडे वाहनाची चाबी नसल्याने त्यांनी कारच्या आतमध्ये तपासणी केली नव्हती. दरम्यान पथकाकडून वाहनाला कोणत्या भागाला क्षती झाली आहे. अपघातात वाहनातील काही दोष कारणीभूत आहे काय? या पद्धतीने तपासाची सूचना असल्याची सूत्रांची माहिती आहे.

दरम्यान या पथकाकडून वाहनाची गती मात्र तपासली जाणार नाही. तर हे काम वाहतूक पोलिसांची समिती अथवा वाहन कंपनीमार्फत तपासले जाते, अशी सूत्रांची माहिती आहे. दरम्यान सलग दुसऱ्या दिवशी आरटीओने केलेल्या तपासणीत कारच्या समोरचा टायर कापलेला आढळून आला, तसेच , कारचे बोनेटसह इतर भागात क्षतीग्रस्त होता, इतरही धक्कादायक माहिती पथकाच्या निदर्शनात आली. कारमधील एअर बॅग अपघातानंतर उघडल्या नसल्याचेही निरीक्षण याप्रसंगी नोंदवले गेले. त्यामुळे या क्षेत्रातील तज्ज्ञानुसार या वाहनाची गती खूप जास्त नसल्याचाही अंदाज वर्तवला जात आहे. दरम्यान या निरीक्षणानंतर आरटीओच्या चमूकडून सुमारे एक ते दीड तासातच हा अहवाल इंटिग्रेटेड रोड एक्सिडेंट डेटा (आय रेड) या संकेतस्थळावर अपलोड केल्या जाण्याची शक्यताही सूत्रांनी वर्तवली जात आहे. दरम्यान आरटीओच्या अपघातानंतरच्या निरीक्षणात साधारणपने गतीचेही निरीक्षण नोंदवले जाते. परंतु या प्रकरणात गतीवर मात्र लक्ष केंद्रीत केले जात नसल्याने पून्हा आरटीओच्या पथकावरही दबाव आहे काय? हा प्रश्न विरोधतांकडून उपस्थित केल्या जाण्याची शक्यता आहे. दरम्यान आरटीओच्या पथकाकडून सदर वाहनाच्या निरीक्षणादरम्यान विविध दिशेने छायाचित्र काढण्यासह व्हिडिओ रेकॉर्डिंगही काही प्रमाणात करण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे.

**प्रकरण काय?**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत बावनकुळे आणि त्याचे दोन मित्र अर्जून हावरे आणि रोनित चिंतमवार हे ऑडी कारने काचीपुरा चौकातून अनियंत्रित गतीने जात होते. सेंट्रल पॉईट हॉटेलसमोर त्यांनी एका कारला धडक दिली. ती धडक एवढी भयंकर होती की ऑडी कारचाही समोरचा भाग चक्काचूर झाला तर धडक बसलेल्या कारचे मोठे नुकसान झाले. या अपघाताचा सर्व थरार दर्शवणारे सीसीटीव्ही समाजमाध्यमांवर व्हायरल झाले. हे वाहन संकेत बावनकुळे यांच्या मालकीची आहे. या घटनेनंतर पोलिसांकडून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्याचाही आरोप होत आहे.

# टू रिलॅक्स फॅमिली स्पावर एसएसबीची धाड

## मसाज पार्लरच्या नावाखाली कुंटणखाना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
वर्दळीच्या ठिकाणी स्पा आणि सलूनच्या नावाखाली सुरू असलेल्या कुंटणखान्याचा गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभाग (एसएसबी)ने भंडाफोड केला. दलाल महिलेस अटक करून 5 पीडित महिला व तरुणींची सुटका केली. प्रेमलता उर्फ प्रिती उर्फ डॉली सुभाष चिंचुलकर (38) रा. मानवसेवानगर, गिट्टीखदान असे अटकेतील दलाल महिलेचे नाव आहे.

मेहाडिया चौकातील टू रिलॅक्स फॅमिली सलून व स्पा सेंटरमधून देह व्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी पंटरला ग्राहक बनवून तेथे पाठवले. पंटरने सौदा ठरताच पोलिसांना इशारा दिला. आधीच दबा धरून बसलेल्या पोलिसांनी स्पा सेंटरमध्ये धाड टाकली.

मसाजच्या नावावर सलूनमध्ये वेगवेगळे कप्पे बनविण्यात आले होते. तेथे ग्राहकांना जागा उपलब्ध करून देत देह व्यवसाय केला जात होता. झडतीमध्ये पोलिसांना तेथे 5 महिला व तरुणी मिळाल्या. स्पाची संचालक डॉली हिने त्यांना पैशांचे आमिष दाखवून देहविक्रीच्या नरकात ढकलले होते.

पोलिसांनी पीडितांचे बयान नोंदवून डॉलीविरुद्ध पीटा ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डॉली अनेक वर्षांपासून या व्यवसायात सक्रीय आहे.

मोबाईल फोन आणि ग्राहकांकडून घेतलेले 3,500 रुपये पोलिसांनी जप्त केले आहेत. ही कारवाई एसएसबीच्या प्रभारी पोनि कविता इसारकर, पोहवा सचिन बढिये, अजय पौनिकर, शेषराव राऊत, समीर शेख, अश्विन मांगे, नितीन वासने, कुणाल मसराम, आरती चव्हाण आणि पूनम शेंडे यांनी केली.

# झाडावरून पडुन इसमाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ११ :
बकऱ्यांसाठी चारा तोडायला झाडावर चढलेल्या वृद्धाचा फांदी तुटून खाली पडल्याने जागीच मृत्यू झाला.

ही घटना तालुक्यातील मेटाउमरी शिवारात आज दुपारी १ वाजताच्या सुमारास घडली. अशोक पुंडलिक रोडे (वय ७०)रा मेटाउमरी असे मृतकाचे नाव असून तो सकाळी ९ च्या सुमारास घरून बकऱ्यांसाठी चारा आणायला शिवारात गेला होता. हिरवा पाला तोडण्यासाठी तो मोहाच्या झाडावर चढला. त्यानंतर काही वेळातच तो उभा असलेली फांदी तुटली त्यामुळे तो खाली कोसळला व त्याचा जागीच मृत्यू झाला. आजूबाजूला शेतात असलेल्या शेतकऱ्यांना हा प्रकार दिसताच ते मदतीला घटनास्थळी आले.परंतु अशोकचा मृत्यू झाला होता.

हिंगणा पोलिसांना माहिती मिळताच ठाणेदार प्रशांत ठवळे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय वाघ, कर्मचारी अरविंद नाईक घटनास्थळी पोहचले. घटनास्थळ पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय हिंगणा येथे पाठविण्यात आला.

# अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक, एकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
अज्ञात वाहनाने दुचाकीस्वार दोन वृद्धांना जबर धडक दिली आणि पळून गेला. यात एका वृद्धाचा मृत्यू झाला, तर दुसरी गंभीर जखमी आहे. हिट अँड रनची ही घटना समृद्धी झिरो सर्कलवर बुधवारी सकाळी घडली. अरुण नामदेव लोणारे (64) रा. गुमगाव बाजार चौक, असे मृताचे नाव आहे. जखमी दीपचंद मेघोजी परतेकी (65) यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

हिंगणाच्या मौजा खडका येथे लोणारे यांचे शेत आहे. परतेकी त्यांच्या शेतात काम करतात. बुधवारी सकाळी लोणारे यांना शेतात काही काम होते. 8.30 वाजताच्या सुमारास परतेकी यांना सोबत घेऊन ते एमएच-40/बीएन-0896 क्रमांकाच्या दुचाकी वाहनाने शेतात जात होते. समृद्धी महामार्गावर झिरो सर्कल एंट्री पॉइंटवर अज्ञात वाहनाच्या चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वाहन चालवून लोणारे यांच्या दुचाकीला जबर धडक दिली आणि पळून गेला. वाहनासह खाली पडून लोणारे आणि परतेकी दोघेही गंभीर जखमी झाले. रस्त्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. हिंगणाचे ठाणेदार प्रशांत ठवरे पथकासह घटनास्थळी पोहोचले. तोपर्यंत लोणारे यांचा मृत्यू झाला होता. परतेकी यांना तत्काळ उपचारार्थ एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले. पंचनामा करून लोणारे यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हिंगणाच्या उपजिल्हा रुग्णालयात रवाना केला. पोलिसांनी लोणारे यांचा मुलगा शैलेषच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.



हिंगणा तालुक्यातील गुमगाव येथील रवींद्र कुंभारे यांच्या घरी विराजमान गणराया

# बुद्धीची देवता गणरायाने नागपुरात साकारलेली विविध रूपे



नवचैतन्य गणेशोत्सव मंडळ, मेडीकल चौक



श्री अष्टविनायक बहुद्देशीय संस्था, धंतोली



नागपूरचा राजा गणेश उत्सव मंडळ, रेशीमबाग



श्री विवेकानंद सांस्कृतिक मंडळ, महाल



श्री पालालेश्वर गणेश उत्सव व सांस्कृतिक क्रीडा मंडळ, महालचा राजा



श्री गणेश उत्सव मंडळ, धरमपेठ







आशिष गोविंदराव देशमुख, श्रीनिकेतन कॉलनी, कळमेश्वर यांचे कडील महालक्ष्मी पूजन. नलिनीताई राजेंद्र देशमुख, कळमेश्वर यांचे कडील महालक्ष्मीचे १५१ वर्ष आज स्थापना करण्यात आली. प्रशांत आनंदराव धरपाळ, वॉर्ड क्र.९ कळमेश्वर यांचे कडील महालक्ष्मीचे १२५ वे वर्ष